cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-३६ शुक्रवार दि.१७ मे २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## तर प्रशासनावरही गुन्हा दाखल व्हावा

घाटकोपर येथे पेट्रोल पंपावर कोसळलेल्या महाकाय होर्डिंगमुळे मृत्यू झालेल्यांची संख्या १६ वर पोहोचली असून, ८८ जण जखमी झाले आहेत. सोमवारी सायंकाळी ४ वाजता मुंबईत अचानक आलेल्या वादळी पावसामुळे घाटकोपर पूर्व छेडानगर येथील पेट्रोल पंपाजवळील महाकाय होर्डिंग कोसळले.

## नाशिकमध्ये मुख्यमंत्री शिंदेंच्या बॅगांची तपासणी

नाशिक : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरूवारी नाशिक दौऱ्यावर होते. दरम्यान एकनाथ शिंदे यांचे हेलिकॉप्टर नाशिक हेलिपॅडवर पोहोचताच पोलिसांनी त्यांच्या बॅगांची तपासणी केली. यामागे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांची पार्श्वभूमी आहे. एकनाथ शिंदे बॅगांमधून पैसे घेऊन जात असल्याचा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला होता. दरम्यान यावेळी एकनाथ शिंदे यांनी संजय राऊतांना प्रत्युत्तर दिले असून आम्ही आताही बॅग घेऊन आल्याचे म्हटले आहे.

# यंदा साखरेचे ११० लाख टन उत्पादन

## गाळप हंगामाचा शेवट गोड, दुष्काळातही महाराष्ट्राची अव्वल कामगिरी

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात २०२३-२४ चा साखर ऊस गाळप हंगाम सुरु होताना, एकूण साखर उत्पादनाबाबत घट होण्याचे अंदाज बांधले जात होते. मात्र, आता झाल्याचे पाहायला मिळत आहे. सध्याच्या घडीला राज्यात सर्व साखर कारखान्यांचे गाळप संपले आहे. याबाबत साखर आयुक्तालयाकडून अधिकृतरित्या माहिती देण्यात आली आहे. मागील वर्षीपेक्षा ४.८ लाख टन उत्पादन अधिक झाल्याचे सांगण्यात आले आहे.**

२०२३-२४ या राज्यातील ऊस गाळप हंगामात एकूण १०७३ लाख मेट्रीक टन उसाचे गाळप झाले आहे. तर या उसापासून राज्यात एकूण १ हजार १०१ लाख क्विंटल साखर उत्पादन झाले आहे. पान २ वर



### विभागवार साखर उत्पादन

कोल्हापूर विभाग : २८०.६४ लाख क्विंटल, पुणे विभाग : २५१.३१ लाख क्विंटल, सोलापूर विभाग : २०६.५९ लाख क्विंटल, अहमदनगर विभाग : १४१.१२ लाख क्विंटल, छत्रपती संभाजीनगर विभाग : ८८.५३ लाख क्विंटल, नांदेड विभाग : १२०.८५ लाख क्विंटल, अमरावती विभाग : ९.३९ लाख क्विंटल, नागपूर विभाग : ३.२७ लाख क्विंटल

### सर्व कारखाने झाले बंद

यंदा राज्यात गाळप केलेल्या एकूण २०७ साखर कारखान्यांपैकी खासगी साखर कारखान्यांची संख्या जास्त होती. त्यापैकी १०३ सहकारी तर १०४ खासगी साखर कारखाने होते. त्यापैकी सर्व साखर कारखान्यांचे गाळप १४ मे अखेर संपलेले आहे. तर यंदा मागच्या वर्षीच्या तुलनेत उसाचे गाळप आणि साखरेचे उत्पादनही अधिक झाले आहे. त्यामुळे यंदाचा उस गाळप हंगाम मागच्या वर्षीपेक्षा सरस ठरला आहे.


### केजरीवालांना विशेष सवलत दिलेली नाही - सुप्रीम कोर्ट

नवी दिल्लीः मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी सध्या जामीनावर तुरुंगाबाहेर असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अंतरिम जामीन देताना कुठलीही विशेष सवलत देण्यात आलेली नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट केले. केजरीवाल हे निवडणूक प्रचारात भाषण देताना, तुम्ही मत दिल्यास मला २ जूननंतर पुन्हा तुरुंगात जावे लागणार नाही, असे जनतेला सांगत असल्याचा मुद्दा उपस्थित करून ईडीच्या वकिलांनी त्याला विरोध केला. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ईडीचा हा विरोध फेटाळून लावला. ईडीने केलेली अटक आणि रिमांडला आव्हान देण्यासाठी केजरीवाल यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठापुढे सुनावणी सुरु आहे. केजरीवाल यांना जामीन देण्याचा आमचा निर्णय हा न्यायसंगत आहे. या निर्णयावर टीका होत असेल तर आम्ही त्याचेही स्वागत करतो, असे खंडपीठाने सांगितले.

# तुमच्या नेत्यांनाही महाराष्ट्रात फिरायचंय; आमच्याकडेही खुंखार लोक

## गुंडगिरी किती दिवस सहन करायची; मनोज जरांगेंचा मुंडे बहीण-भावाला इशारा







**बीड । प्रतिनिधी**

**आम्हाला बीड जिल्हयात कसा येतो असे म्हणातात, पण तुमच्याही नेत्यांना महाराष्ट्रात फिरायचे आहे. तुमची गुंडगिरी आम्ही किती दिवस सहन करायची, आमच्याकडेही खुंखार लोक आहेत. असा सवाल विचारत मनोज जरांगे पाटील यांनी मुंडे बहीण-भावावर हल्लाबोल केला. बीडच्या नांदुर घाट गावात रात्री झालेल्या दगडफेकीमध्ये अनेक जण जखमी झाले आहेत. या जखमी रुग्णांची मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी बीड जिल्हा रुग्णालयात जाऊन भेट घेतली. यावेळी माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील यांनी पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यावर टीकास्त्र डागले.**

मला सुद्धा धमकी देत आहेत, बघून घेऊ, कचाट्यात ये मारून टाकू, मला बीडमध्ये येऊ द्यायचे नाही, असे म्हणत आहेत. आता तर मी रोज बीडमध्ये येणार, दोघं बहीण-भाऊ कार्यकर्त्यांना माझ्या विरोधात पोस्ट टाकायला लावत आहेत, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. मराठा आरक्षणासाठीच्या उपोषणाला नाव ठेवले त्यावेळेस विरोध केला. पण मी एकदाही म्हणालो नाही पंकजाताईला पाडा किंवा महाविकास आघाडीचा उमेदवार पाडा. पण हे आम्हाला माहिती आहे वेळ निघून गेले की असे होणारच. मी बलिदान देण्यासाठी तयार आहे. मात्र, मी मागे हटणार नाही. मला बीडमध्ये येऊ देणार नाहीत तर तुमच्याही नेत्यांना महाराष्ट्रात फिरायचे आहे. तुमची गुंडगिरी आम्ही किती दिवस सहन करायची, आमच्याकडेही खुंखार लोक आहेत. मराठा समाज इतका लेचापेचा नाही, तुमच्याही नेत्यांना महाराष्ट्रात आणि मुंबई, पुणे, संभाजीनगरला फिरायचे आहे. मला बीडमध्ये येऊ देणार नाहीत, असे म्हणत आहेत. मराठा समाजाचे असे उपकार फेडता का? तुमच्या व्यासपीठावर मराठा समाजातील नेत्यांना बसायला जागा नव्हती.

### मराठा समाजात खूप मोठी खदखद

**मराठ्यांची मतं लागतात, मराठ्याचे नेते प्रचाराला लागतात. मराठ्याच्या मतांवर मोठे व्हावे लागते, पण अन्याय हा प्रत्येकवर्षी सुरु आहे. स्वतःचे संकट अंगावर आहे. त्यावेळेस आपला सहित पाया पडतात आणि संकट निघून गेले की लगेच बदलतात. आष्टी पाटोद्यात काय झाले, बीडमध्ये काय झाले, माजलगाव आणि परळीमध्ये काय झाले संपूर्ण महाराष्ट्र बघत असल्याचे जरांगे म्हणाले.**

### माझे रक्षण मराठा समाज करणार

**माझं रक्षण मराठा समाज करत आहे. मला कोणाची गरज नाही. बघू किती दिवस सहन होत आहे. ते पोलीस अधीक्षक कशामुळे गुन्हे दाखल करून घेत नाहीत? लेकरांची तडफड होते, गृहमंत्री साहेबांचे राज्य आहे का? अन्याय सुरू आहे. जात संपली की तुम्हीही संपलात, मराठ्यांच्या नेत्यांनो सावधान, आम्ही शांत पद्धतीने बघणार आहोत. बहिण भाऊ किती दिवस हल्ले करून येतात हे पाहणार आहोत. जोपर्यंत सहन होत आहे, तोपर्यंत सहन करू, असे जरांगे पाटील यांनी सांगितले.**

### मराठ्यांच्या जीवावर मोठे होऊन त्यांचाच जीव घ्यायचा!

मराठ्यांच्या जीवावर मोठा होऊन मराठ्यांचा जीव घ्यायचा असेल तर मराठा जीव द्यायला तयार आहे. दोघा बहीण-भावांचा विषय आहे. शेवटी मराठी मत घ्यायचे, मोठे व्हायचे, कोणत्याही पक्षात राहायचं आणि मोठे व्हायचे. हा खरा अपमान मराठा नेत्यांचा आहे. जात संपली तर नेत्यांना काय किंमत राहणार?, असा सवाल जरांगे -पाटील यांनी उपस्थित केला.

### नारायण गडावरील मेळावा पुढे ढकलला

श्री क्षेत्र नारायण गडावर मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मराठा समाजाचा विराट मेळावा आयोजित करण्यात आला होता. हा मेळावा शेकडो एकर जमिनीवर होणार होता. मात्र यंदाची दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाई यामुळे समाजाचा हा मेळावा पुढे ढकलण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

# सुमित वाघमारे खुन प्रकरणी दोघांना जन्मठेप

## सत्र न्यायालयाचा महत्वपुर्ण निकाल; दोघांची निर्दोष मुक्तता

**बीड । प्रतिनिधी**



शहरात २०१८ मध्ये गाजलेल्या सुमित वाघमारे खून प्रकरणाचा निकाल लागला असून यामध्ये आरोपी बालाजी लांडगे व संकेत वाघ या दोघांना जन्मठेपीची शिक्षा गुरूवार, दि.१६ मे रोजी दुसरे सत्र न्यायालयाने सुनावली आहे. तर या प्रकरणात दोघांना पुराव्या अभावी निर्दोष मुक्त केले आहे.

### २०१८ मध्ये झाला होता थरारक खून

सुमित खून प्रकरण संपुर्ण महाराष्ट्रात गाजले होते. प्रेमातून भाग्यश्रीने घरातील लोकांच्या इच्छे विरोधात सुमितशी विवाह केला होता. ही बाब सतत भाग्यश्रीचा भाऊ बालाजी लांडगे यास खटकत होती. दि.१९ डिसेंबर २०१८ रोजी इंजिनिरिंगचा शेवटचा पेपर देवून सुमित वाघमारे आणि भाग्यश्री वाघमारे हे महाविद्यालयाच्या बाहेर आले असता या ठिकाणी भाग्यश्रीचा भाऊ बालाजी लांडगे व त्याचा मित्र संकेत वाघ हे दोघेजण दबा धरून होते. यावेळी त्यांनी सुमितवर सपासप वार करीत त्याचा खून केला होता. या घटनेने बीड जिल्हा पुरता हादरला होता.

शहरातील आदित्य इंजिनिअरींग महाविद्यालयात सुमित वाघमारे आणि भाग्यश्री हे दोघे शिक्षण पान २ वर

# अन् एका पोस्टने घात केला; नांदुरघाटमध्ये दोन गटात दगडफेक

## महिलेसह तिघे जखमी; दोन्ही गटातील १५६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदुरघाट येथे निवडणुकीच्या कारणावरून एका नेत्यावर सोशल मीडियावर पोस्ट टाकल्याने गावात दंगल झाली आहे. या प्रकरणी पोलीस आणि एका जखमी व्यक्तीच्या फिर्यादीवरून दोन वेगवेगळे गुन्हे दखल करण्यात आले आहेत. केज तालुक्यील नांदूरघाट येथे दि. १५ में रोजी एकाने एक सोशल मीडियावर निवडणुकीच्या संदर्भात राजकीय नेते आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना चीड निर्माण होईल अशा प्रकारची फेसबुक पोस्ट व्हायरल केली. त्यामुळे गावात तणाव निर्माण होऊन आजूबाजूच्या गावातील नेत्यांचे समर्थक एकत्र जमा झाले. जमाव नांदूरघाट येथे जमा होताच त्यांच्यात व प्रतिस्पर्धी गट एकमेकांना भिडले. त्यांच्यात लाठ्या, काठ्या आणि दगड एकमेकांच्या दिशेने भिरकवू लागले. ही माहिती मिळताच दूरस्थ पोलीस ठाणे नांदूरघाट येथे कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी उमेश आघाव यांनी ही माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना देवून जमावाला आटोक्यात आणण्यासाठी जादा पोलीस कुमक पाठविण्याची मागणी केली. त्यानंतर केज सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस उपनिरिक्षक राजेश पाटील, पोलीस उपनिरिक्षक वैभव सारंग आणि पोलीस कर्मचारी घटनास्थळी हजर झाले. त्यांनी जमावाला काबूत आणले.

दरम्यान या दगडफेकीत जखमी असलेले राजेंद्र गोपाळघरे यांनी केज पोलीस पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, दि. १५ मे रोजी रात्री ८:३० वा.मी आणि माझी पत्नी कविता हे घरात असताना १०० ते १५० लोकांचा जमाव आला. त्या जमावाने एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत त्यांनी राजेंद्र गोपाळघरे यांना तुम्ही परवा पान २ वर

### गोळीबार अन् तलवारी काढल्याची चर्चा

नांदुरघाटमध्ये ज्या वेळी दगडफेक करण्यात येत होती, त्यावेळी कोणी तरी गोळीबार केला व तलवारी सुध्दा काढल्याची चर्चा आहे. याबाबत मात्र अधिकृत दुजोरा मिळाला नाही.

### कोणीही कायदा हातात घेऊ नये

सोशल मीडियावर टाकलेल्या पोस्टवर दोन गट समोरासमोर भिडले. दगडफेकही झाली. माहिती मिळताच फोर्ससह गावात पोहोचलो. दगडफेकीत एका महिलेसह तिघे किरकोळ जखमी आहेत. सध्या गावात पोलिस फोर्स तैनात असून कोणीही कायदा हातात घेऊ नये. तसेच पोलिसांकडून शांततेचे आवाहन केले आहे.

**प्रशांत महाजन, पोलिस निरीक्षक, केज.**

# मोदी यांचा आत्मविश्वास ढळला-शरद पवार

**नाशिक। प्रतिनिधी**

नरेंद्र मोदी यांच्याकडे दुसरे सांगण्यासारखे काही नाही. त्यामुळे ते लक्ष विचलित करण्याचे काम करत आहेत. ते सध्या जे बोलत आहेत, त्यातील १ टक्का सुद्धा काही खरे नाही. ज्यावेळी देश चालवायचा असेल, त्यावेळी जाती-धर्माचा विचार करून देश चालवता येईल का? नरेंद्र मोदी यांचा पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ मे २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| वाण (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू : २४.०० क्विंटल | २,३९० | २,६०० | २,४५८ |
| ज्वारी/हायब्रिड : १२४.०० क्विंटल | १,५०१ | ३,२०१ | २,४४३ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : २१.५० क्विंटल | ९,६०२ | ११,५२० | १०,९९५ |
| उडीद : ५.५० क्विंटल | ७,९०० | ७,९०१ | ७,९०० |
| बाजरी: ५२.५० क्विंटल | २,२७१ | २,६३० | २,४८६ |
| चिंच/लोकल: १०.०० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: ३६.०० क्विंटल | ४,२६० | ४,५५० | ४,४०५ |
| हरभरा: २३.५० क्विंटल | ५,६०० | ५,७८० | ५,६९२ |

# राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणणार

## कृषी आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम यांचा पुणे येथे निर्धार

**पुणे । प्रतिनिधी**

**नैसर्गिक शेतीतील उत्पादने ही नागरिकांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असून राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे कृषी विभागाचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन राज्याचे कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले.**




कृषी व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार व कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने नैसर्गिक शेतीबाबत विज्ञान आणि नैसर्गिक शेती या विषयावरील यशदा येथे आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कृषी व शेतकरी विभाग भारत सरकार व एकात्मिक पोषण व्यवस्थापनच्या उपसचिव रचना कुमार, सहसचिव डॉ. योगीता राणा, आयसीएआरचे सहायक महासंचालक एस. के. शर्मा, डॉ. राजबीर सिंग, कृषी संचालक (आत्मा) दशरथ तांभाळे, पद्मश्री संजय पाटील, देशाच्या पश्चिम भागातील राज्यांचे कृषी सचिव, आयुक्त, संचालक, आयसीएआरचे शास्त्रज्ञ, शेतकरी आदी उपस्थित होते.

डॉ. गेडाम म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनअंतर्गत राज्यातील किमान २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. नैसर्गिक शेतीचे धोरण अंमलबजावणीकरीता लोकप्रतिनिधींचेही सहकार्य घेण्याचा प्रयत्न आहे. नैसर्गिक शेतीचे फायदे, पाण्याचे व्यवस्थापन, नैसर्गिक शेतीतील उत्पादनाला बाजारपेठ याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून देशात नैसर्गिक शेती करण्याविषयी धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत असून राज्यातही ते धोरण अवलंबिण्यात येत आहे. नैसर्गिक शेती संदर्भातील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना मराठी भाषेत भाषांतर करण्यात येतील. परंपरागत कृषी विकास योजनेअंतर्गत नैसर्गिक शेतीकडे वळण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# तर प्रशासनावरही गुन्हा दाखल व्हावा

घाटकोपर येथे पेट्रोल पंपावर कोसळलेल्या महाकाय होर्डिंगमुळे मृत्यू झालेल्यांची संख्या १६ वर पोहोचली असून, ८८ जण जखमी झाले आहेत. सोमवारी सायंकाळी ४ वाजता मुंबईत अचानक आलेल्या वादळी पावसामुळे घाटकोपर पूर्व छेडानगर येथील पेट्रोल पंपाजवळील महाकाय होर्डिंग कोसळले. पालिकेच्या नियमानुसार होर्डिंगचा आकार ४० बाय ४० फूट असणे अनिवार्य असताना लोहमार्ग रेल्वे पोलिस विभागाच्या अखत्यारित असलेले हे १२० बाय १२० फुटांपेक्षा जास्त आकाराचे होर्डिंग बेकायदेशीररीत्या उभारण्यात आले होते. हे होर्डिंग उभारताना मजबूत पाया नसल्याचे पालिकेच्या निदर्शनास आले आहे. या घटनेनंतर रेल्वे हद्दीतील सर्व होर्डिंगचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यात तब्बल ९९ ठिकाणचे होर्डिंग 'ओव्हर साईज' असल्याचे आढळून आले आहेत. म्हणजेच मुंबईकरांचा जीव टांगणीला लागला आहे.

जाहिरात आणि पंप उभारण्यात आलेली जमीन राज्य सरकारने पोलिस हाऊसिंगला दिली होती. त्यांनी ती जागा लोहमार्ग पोलिसांना दिली. लोहमार्ग पोलिसांकडून ही जागा पंप उभारण्यासाठी टेंडर काढून देण्यात आली. त्यामुळे या ठिकाणी उभारण्यात आलेला पंप बेकायदेशीर असल्याचा दावा पालिकेने केला आहे. या होर्डिंग प्रकरणाचे राजकीय पडसाद उमटले आहेत. भाजप आमदार राम कदम यांनी आरोपी भावेश भिंडे आणि उद्धव ठाकरे यांचा फोटो समाजमाध्यमावर शेअर केल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये कलगीतुरा रंगला. भाजप नेते किरीट सोमय्या यांनीही महापालिकेतील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुढे करत उद्धव ठाकरेंवर शरसंधान करण्याचा प्रयत्न केला. मुंबईतील होर्डिंगमाफियांना महाभ्रष्ट युती सरकारचे संरक्षण असून राज्य सरकार व पालिकेवरच सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. या सर्व आरोप-प्रत्यारोपांत सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनी मात्र उद्धव ठाकरे यांची पाठराखण करत सरकारलाच घरचा आहेर दिला. भुजबळ म्हणाले, सरकार आमचे, महापालिका आमचीच, मग उद्धव ठाकरेंचा काय संबंध? असे अनेक व्यापारी आमच्याकडे पुष्पगुच्छ, मिठाई घेऊन येतात, आमच्यासोबत फोटो काढतात. त्यांना नाही म्हणता येत नाही. संबंधित व्यक्ती आपला कार्यकर्ता आहे की नाही हे आम्हाला माहीत नसते. मुंबईत पावसाळ्यात अनेक दुर्घटना घडतात, दुर्घटना घडल्यानंतर महापालिका प्रशासन आणि राज्य सरकारला जाग येते ही वस्तुस्थिती आहे. मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात अनधिकृत बांधकामे आणि होर्डिंग्जना पेव फुटल्याचे बोलले जात आहे. ठाण्यात होर्डिंगला परवानगी देताना चुकीच्या पद्धतीने परवानगी देण्यात आली असून शहरातील फुटपाथ आणि नाल्यात होर्डिंग उभारण्यात आले आहेत. अशी स्थिती केवळ मोठ्या शहरात आहे असे नाही, छोट्या शहरातही तीच स्थिती आहे. पालिकेची परवानगी न घेता फलक उभारले जातात. कोणीही सोम्या-गोम्या शहरात, गावात येणार असला की त्याच्या स्वागतार्थ चांगल्या रस्त्याची दुर्दशा उठवून बांबू रोवून बॅनर्स लावले जातात. त्यानंतर रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची तसदी घेतली जात नाही. कोणत्याही छोट्या-मोठ्या शहरात हे दृष्य हमखास दिसते. कुठल्याही यंत्रणेच्या बेपर्वाईमुळे सर्वसामान्यांचे बळी जात असतील तर तो हत्येइतकाच गंभीर प्रकार मानला गेला पाहिजे.

कुठलीही दुर्घटना घडली की नियमांचा आडोसा घेत आपला बचाव करण्यात अधिकारी वर्ग पारंगत असतो. संबंधित कंत्राटदाराविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल केला की अधिकारी वर्ग पुढील कामासाठी मोकळा होतो. एखाद्या दुर्घटनेला अधिकारी जबाबदार असेल तर त्याच्यावरही गुन्हा दाखल झाला पाहिजे. त्याशिवाय खाबुगिरी आणि काटेकोरपणे पडताळणी न करता बिल्डर्सना बेधडकपणे दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांना आळा बसणार नाही. ज्या यंत्रणेने नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावयास हवी तीच यंत्रणा जागोजागी मृत्यूचे सापळे उभे करत आहे असे खेदाने म्हणावे लागते.

# मोदी झोळी घेऊन निघून जातील, तुमचे काय होणार?

## उद्धव ठाकरेंचा भाजपला सवाल

**मुंबई । प्रतिनिधी**

**नरेंद्र मोदींची पंतप्रधान म्हणून मुंबईतील शेवटची सभा असून त्यानंतर मोदी हे पंतप्रधान राहणार नाहीत, ४ जून नंतर ते झोळी घेऊन निघून जातील, नंतर तुमचे काय होणार असा सवाल उद्धव ठाकरेंनी भाजपच्या नेत्यांना विचारला आहे. गेल्या दहा वर्षांत मोदींनी झोप न घेतल्याने त्यांचा मेंदू आता क्षीण झाला आहे, भाजपने या काळात नवीन नेतृत्व तयार केले नाही असा टोलाही उद्धव ठाकरे यांनी लगावला.**

उद्धव ठाकरे म्हणाले की, ''शिवसेनेने हिंदुत्व सोडले असल्याचा आरोप करणाऱ्या भाजपसोबत असलेले इतर नेते, नितीश कुमार आणि चंद्राबाबू



हे हिंदुत्ववादी आहेत का याचे उत्तर भाजपने द्यावे. खोटं कोण बोलतेय हे जगाने बघितले आहे. २०१९ साली मोदींनी म्हटले होते की शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार, सर्वांना घरे देणार. आताही त्यांची जुमलेबाजी सुरू आहे. त्यांना माझा जय भवानी हा शब्दही चालत नाही. देश आता मोदींच्या हातात द्यायचे कारण नाही, त्यांचे कॉन्ट्रॅक्ट संपल आहे. असे उद्धव ठाकरे म्हणाले. ते म्हणाले की, ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप, आदर्श घोटाळा झाल्याचा आरो, इक्बाल मिर्ची आणि विमान घोटाळा असे अनेक आरोप कोणी केले? मोदींनी आता त्यांनाच सोबत घेतले आहे. मोदींच्या मेंदूला क्षीण आलेला आहे. ४ जूननंतर मोदी पंतप्रधान राहणार नाहीत. मोदींना आता ७५ वर्षे पूर्ण होणार आहेत, त्यामुळे भाजपकडे दुसरा चेहरा नाही. गेल्या १० वर्षात भाजपने नेतृत्व तयार केले नाही. ४०० पार म्हणत असाल तर तुम्ही इतर पक्ष का फोडता? असा सवालही त्यांनी केला. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणार अशी टीका भाजपने केल्यानंतर त्याला उद्धव ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले की, शिवसेना गेली ३० वर्षे भाजपसोबत होती, म्हणून काय मी माझा पक्ष त्यांच्यात विलीन केला का? शरद पवारांनी जे वक्तव्य केले ते लहान लहान प्रादेशिक पक्षांबद्दल होते. एकनाथ शिंदे यांचा पक्षच ४ जूननंतर भाजपमध्ये विलीन होणार आहे, असे ठाकरे म्हणाले.

# संत श्रीगुरु बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवास आज सुरूवात

## भागवत कथा प्रवक्ते प.पू राधाकृष्ण महाराज राजस्थान याच्या सुश्राव्य वाणीतून गोड भागवत कथा

### १००० कलशधारी सुवासिनी महिलांची प्रभात फेरी ठरणार लक्षवेधी

**नेकनुर । प्रतिनिधी**

वारकरी सांप्रदायातील महान संत श्रीगुरु वै. बंकटस्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी महोत्सवास आज मोठ्या थाटात सुरूवात होणार आहे.. श्रीक्षेत्र नेकनूर येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. आज दिनांक १७ में वार शुक्रवार ते दिनांक २४ मे वार शुक्रवार या आठ दिवसाच्या कालावधीमध्ये भव्य ज्ञानयज्ञ संपन्न होणार आहे.. यात देशातील सुप्रसिद्ध भागवत कथाकार गोवत्सल श्री ह भ प राधाकृष्ण महाराज राजस्थान यांची सात दिवस सुंदर भागवत कथा होणार आहे.तसेच. महाराष्ट्रातील





नामांकित कीर्तनकारांचे कीर्तने होणार आहेत. या सर्व कार्यक्रमाचा भावी भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती बंकट स्वामी मठ नेकनुर, पंढरपूर,आळंदी. विश्वस्त,अन्नदान कमिटी, गावकरी मंडळी नेकनुरकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

आज पुण्यतिथी उत्सवाच्या प्रारंभी नेकनूर शहरातून भव्य शोभायात्रा निघणार आहे. या शोभा यात्रेची सुरुवात सकाळीं ८ वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिर शिक्षक कॉलनी निनगुर येथून होणार आहे. यामध्ये १००० महिला कलश घेऊन सहभागी होणार आहेत तर टाळ मृदंगाच्या गजरात.. बाल वारकऱ्यांच्या सुंदर अशा पावलींनी या प्रभात फेरीमध्ये रंग भरवले जाणार आहेत.. या प्रभात फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी आठ वाजता सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे

# शेतकरी, शेतमजूर, कष्टकऱ्यांच्या महेश शिंदे यांनी जाणून घेतल्या व्यथा

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात १३ मे रोजी शांततेत मतदान पार पडले. त्यानंतर मी जनतेच्या दारात आलो आहे. आता मी मत मागण्यासाठी नाही तर माझं मत मांडण्यासाठी आलो आहे. त्यासोबतच माझ्या जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी माता-भगिनी यांच्यासह दीन, दलित गोरगरिबांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी आलो आहे. मी आपल्या व्यथा, वेदना समस्या आणि अडीअडचणी जाणून घेऊन त्या माणुसकी सेवा फाउंडेशनच्या माध्यमातून सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार आहे. बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी या जिल्ह्याची ओळख आहे. ही ओळख पुसण्यासाठी आणि गरिबीत जीवन जगणाऱ्या हातावर पोट असणाऱ्या माता-भगिनींच्या हाताला काम देण्यासाठी येत्या काही दिवसातच ठोस अशी उपाययोजना करणार आहे. हे सांगण्यासाठी आपल्या दारात आलो अशा शब्दांत बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा माणुसकी सेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महेश भाऊ शिंदे यांनी गुरुवार दिनांक दि.१५ मे आणि १६ मे रोजी बीड जिल्ह्यातील विविध गावात सलग दोन दिवस भेटीगाठी झंझावाती दौऱ्यात जनतेशी संवाद साधताना सांगितले. या वेळी त्यांच्या समवेत बीड जिल्हाध्यक्ष सर्जेराव मस्के,अंकुश गंगावणे, विठ्ठलराव ढोकणे, बनसोडे, गणपत डोळस, सुखदेव लांडगे, आत्माराम वाव्हळकर, शिवप्रसाद सिरसाट, नितीन शिंदे, बिभीषण जावळे, भास्कर वाघमारे यांच्यासह आदी उपस्थित होते.**

छत्रपती शिवाजी महाराज फुले शाहू आंबेडकरांचा विचारांचा वारसा घेऊन जनसेवा करण्यासाठी बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र महेश शिंदे यांनी माणुसकी सेवा फाउंडेशनची स्थापना केली. या माणूसकी सेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी राज्यभर भरीव असं काम करण्यासाठी सुरुवात केली आहे. यावेळी खऱ्या अर्थान जन्मभूमी असणाऱ्या बीड जिल्ह्यातील शेतकरी शेतमजूर कष्टकरी माता-भगिनी दीन दलितांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्य देण्याचे ठरवले. या अनुषंगाने मागील काही दिवसापासून बीड जिल्ह्यामध्ये जोरदार काम करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान लोकसभा २०२४ साठी देशामध्ये तसेच राज्यामध्ये मतदान प्रक्रिया सुरू आहे. बीड जिल्ह्यासाठी १३ मे रोजी मतदान पार पडल्यानंतर माणुसकी सेवा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महेश भाऊ शिंदे यांनी सामाजिक कार्याला जोमाने सुरुवात केली



आहे. याचाच भाग म्हणून महेश भाऊ शिंदे यांनी १५ मे आणि १६ मे रोजी बीड जिल्ह्यात सलग दोन दिवस भेटीगाठीसाठी झंझावाती दौरा

धारूर, अंबेजोगाई, केज, वडवणी, यासह बीड तालुक्यातील प्रमुख गावात ज्यामध्ये अरणवाडी, चोरंबा, थेटेगव्हाण, सोनीमोहा, धुनकवड, आंबेवडगाव, तेलगाव, घाटजवळा, पिंपळनेर, दुसऱ्या दिवशी गुंदा, वडगाव, आहेर चिंचोली, ईट आणि जवळा यासह इतर अनेक गावांना भेटी दिल्या. महेश भाऊ शिंदे यांच्या प्रत्येक गावातील कॉर्नर बैठकांना नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. या बैठकी दरम्यान अनेकांनी आपल्या अडीअडचणी आणि समस्यांचा पाढा महेश भाऊ शिंदे यांच्यासमोर वाचला. त्यानंतर महेश भाऊ शिंदे यांनी जमलेल्या नागरिकांशी संवाद साधला. यावेळी बोलताना महेश भाऊ शिंदे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अनेक नेते कार्यकर्ते पदाधिकारी तुम्हाला येऊन भेटले असतील. प्रत्येक जणांनी आपल्याच पक्षाच्या उमेदवाराला मतदान द्या अशी विनंती केली असेल वेळप्रसंगी तुमच्या हातापाया पडत असतील आणि तुमचं अमूल्य मत माझ्याच पदरात टाका असं वारंवार म्हणत असतील परंतु आता काही निवडणुकीचा प्रचार राहिला नाही. त्यामुळे मी आता तुम्हाला तुमचं अमूल्य मत मागण्यासाठी इथे आलो नाही. तर मी तुमच्याशी संवाद साधायला आलो आहे. तुमच्या अडीअडचणी, तुमचे प्रश्न ऐकून घेण्यासाठी, तुमच्या व्यथा जाणून घेण्यासाठी आलो आहे. वास्तविकरित्या खऱ्या अर्थाने दुःख काय असतं, दारिद्र्य कसं असतं मला माहित आहे. माझं बालपण गरीबीत गेल्यामुळे गरिबी, दुःख आणि दारिद्र्याचा मला अनुभव आहे. त्यामुळे दुःखात आणि दारिद्र्यात माणूस कसा पिचला जातो. याचा संपूर्ण अनुभव मला मिळाला आहे. या अनुभवाची शिदोरी घेऊन साधुसंत आणि थोर महापुरुषांनी दाखवलेल्या मार्गाने मी काम करत आहे. साधू संतांचे, थोर महापुरुषांचे आणि आई वडिलांचे आशीर्वाद घेऊन माझ्या मनगटातील ताकदीच्या आणि बुध्दीच्या जोरावर मी माझ्या स्वतःच्या कुटुंबाबरोबरच या देशाचे या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. ही भावना मनाशी ठेवून स्वतःला समाजकार्यात झोकून दिले आहे. थोर साधू संतांच्या महापुरुषांच्या विचाराने प्रेरित होऊन माणुसकी सेवा फाउंडेशन या नावाप्रमाणेच माणसा-माणसात लोप पावत चाललेला जिव्हाळा आपुलकी आणि प्रेमभाव पुन्हा निर्माण करण्यासाठी, हरवत चाललेली माणुसकी पुन्हा एकदा लोकांना अनुभवायला लावण्यासाठी मी आज लोकांच्या दारात जात आहे. लोकांच्या समस्या, अडचणी समजून घेत आहे. शेतकरी शेतमजूर कष्टकरी माता-भगिनी दीन -दलित यांच्या सोबत विधवा, परित्यक्ता, वयोवृद्ध महिलांचे प्रश्न सोडवयाचे आहेत. मला माझ्या जिल्ह्यातील माता भगिनींच्या डोक्यावरचा हंडा कायमचा उतरण्यासाठी पाण्याचा कायम प्रश्न मिटविण्यासाठी मी शासनाच्या मदतीने ठोस उपाययोजना करणार आहे. ऊसतोड कामगारांचा जिल्हा ही या जिल्ह्याची ओळख पुसण्यासाठी आणि गरिबीत जीवन जगणाऱ्या हातावर पोट असणाऱ्या माता-भगिनींच्या हाताला काम देण्यासाठी येत्या काही दिवसातच शासनाच्या सहकार्याने, माणुसकी सेवा फाउंडेशनच्या माध्यमातून छोटे-मोठे उद्योग जिल्ह्यात सुरू करणार आहे. या योजना कशा राबवणार आहेत. त्याबाबतची सविस्तर माहिती यावेळी महेश भाऊ शिंदे यांनी दिली. प्रत्येक गावात महेश भाऊ शिंदे यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. भागवत साळवे, प्रकाश वेदपाठक, संजय सुरवसे, संजय तेलंग, अभिमन्यू साळवे, मल्हारी भालेराव, रोहिदास बनसोडे यांच्यासह प्रत्येक गावातील बैठकीला शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# पान १वरून...

पान १वरून...

**यंदा साखरेचे ११० लाख**

मागील वर्षीच्या २०२२-२३ च्या गाळप हंगामात एकूण १ हजार ५५ लाख मेट्रीक टन उसाचे गाळप झाले होते. त्यातून १ हजार ५३ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन झाले होते. अर्थात यावर्षीच्या गाळप हंगामात एकूण ४८ लाख क्विंटल (४.८ लाख टन) साखरेचे उत्पादन अधिक झाले आहे. मागील वर्षीच्या २०२२-२३ च्या गाळप हंगामात राज्यातील सरासरी साखर उतारा हा ९.९८ एवढा होता. ज्यात २०२३-२४ या राज्यातील ऊस गाळप हंगामात वाढ होऊन, तो १०.२७ एवढा झाला आहे. यामुळे राज्यातील एकूण साखर उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली आहे. दुष्काळामुळे साखर उत्पादनात घट होण्याची शक्यता निर्माण झाल्याने केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर निर्बंध घातले होते. परिणामी, साखर उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली आहे.

-------

**अन् एका पोस्टने घात केला;**

झालेल्या लोकसभा निवडनुकीत कमळाचे फुलावर मतदान का केले? असे म्हणुन त्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. जमावातील लोक त्यांना जिवे मारा, ठार मारा असे ओरडु लागले. व मारहाण करु लागले, सदर प्रकार पाहुन त्यांची पत्नी कविता ही त्यांना मारहाण करु नका, काय झाले ते सांगा असे म्हणून मला त्यांचे तावडीतून सोडवीत असतांना त्यातील काही लोकांनी कविता गोपाळघरे यांच्या हाताला धरुन घराबाहेर ओढले. तसेच त्यांच्या हाताला, पायाला व नाकाच्या डाव्या बाजुला लाथा बुक्क्यानी मारहाण केली. जमावातील लोकांचे हातात काठ्या, तलवारी, दगडे होते. त्या पैकी आमोल सखाराम जाधव, श्रीकांत तुकाराम जाधव, सागर तुकाराम जाधव, शंकर भानुदास जाधव, सुधीर जाधव, प्रदिप जाधव व १०० ते १५० लोकांनी मनोज जरांगे पाटील जिंदाबाद अशा घोषणा देवून राजेंद्र गोपळघरे यांच्यावर व घरावर दगडफेक करु लागले. अमोल जाधव, श्रीकांत तुकाराम जाधव, शंकर भानुदास जाधव, प्रदिप जाधव यांचे हातात तलवारी व लोखंडी गज होते. तसेच सागर जाधव याने त्याचे हातातील पिस्टलने हवेत गोळीबार केला. श्रीकांत तुकाराम जाधव याने त्याचे हातातील लोखंडी गजाने माझे डोक्यावर जिवे मारण्याच्या उद्देशाने जबर मारहाण केली तसेच अमोल जाधव याने त्याचे हातातील तलवारीची मुठ कविता गोपाळ घरे यांच्या नाकावर मारून जखमी केले अशा आशयाच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात आमोल सखाराम जाधव, श्रीकांत तुकाराम जाधव, सागर तुकाराम जाधव, शंकर भानुदास जाधव, सुधीर जाधव, प्रदिप जाधव व १०० ते १५० यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु.र.नं. २५७/२०२४ भा दं वि ३०७, ३५४, ४५२, १४३, १४७, १४८, १४९, शस्त्र अधिनियम ३, ४, २५ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील हे करीत आहेत.

---------------

**सुमित वाघमारे खुन**

घेत होते. या दोघांचे एकमेकांवर प्रेम होते. भाग्यश्रीने घरातील लोकांच्या इच्छे विरोधात सुमितशी विवाह केला होता.ही बाब सतत भाग्यश्रीचा भाऊ बालाजी लांडगे यास खटकत होती.दि.१९ डिसेंबर २०१८ रोजी इंजिनिरिंगचा शेवटचा पेपर देवून सुमित वाघमारे आणि भाग्यश्री वाघमारे हे महाविद्यालयाच्या बाहेर आले असता या ठिकाणी भाग्यश्रीचा भाऊ बालाजी लांडगे व त्याचा मित्र संकेत वाघ हे दोघेजण दबा धरून होते. सुमित कॉलेजच्या बाहेर पडताच तो दुचाकीवर असताना बालाजी लांडगे याने त्याच्यावर चाकुने वार केला. तो खाली पडल्यानंतर संकेत वाघ याने त्यास पकडले आणि बालाजीने पुन्हा त्याच्या छातीत व पोटावर सहा वार केले. यावेळी भाग्यश्रीने हा वाद सोडविण्याचा प्रयत्न केला असता तिला ढकलून देण्यात आले. जखमी अवस्थेत सुमित रस्त्यापर्यंत पळत आला. मात्र या ठिकाणी कोसळल्यानंतर बालाजी आणि संकेत घटनास्थळावरून फरार झाले. सुमितला उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणी करून त्याचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. या प्रकरणी पेठ बीड पोलिस ठाण्यात भाग्यश्री वाघमारे हिच्या फिर्यादीवरून कलम ३०२,३४ भादविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचा तपास तत्कालीन पो.नि. पंकज उदावंत यांनी केला असता या तपासामध्ये कृष्णा क्षीरसागर व गजानन क्षीरसागर या दोघांच्या सहकार्याने कटकारस्थान रचल्याचे तपासात उघड झाले होते. त्यामुळे या प्रकरणात भाग्यश्रीच्या फिर्यादीवरून ॲट्रॉसिटीचाही गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पूर्ण करून प्रकरण बीडच्या दुसरे सत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी न्यायालयाने ३५ जणांच्या साक्षी नोंदविल्या. जवळपास साडेपाच वर्षे चाललेल्या प्रकरणात वेगवेगळ्या घटना घडून फिर्यादी असलेल्या भाग्यश्रीने आपली साक्ष न्यायालयासमोर बदलली होती. तर या प्रकरणासाठी विशेष सरकारी वकील ॲड. मिलींद वाघीरकर यांची हे प्रकरण चालवू नये यासाठी त्यांचीही तक्रार करण्यात आली होती. मात्र विधी व न्याय विभागाने ॲड मिलींद वाघीरकर यांनाच कायम ठेवले होते. न्यायालयाने सर्व साक्षी पुराव्यावरून आरोपी बालाजी लांडगे व संकेत वाघ यांना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली तर कृष्णा आणि गजानन क्षीरसागर यांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. या प्रकरणी सरकारी पक्षाच्या वतीने सहाय्यक सरकारी वकील ॲड मिलींद वाघीरकर यांनी काम पाहीले. तर पैरवी अधिकारी म्हणून मिसाळ यांनी सहकार्य केले.

--------------------

**मोदी यांचा आत्मविश्वास**

आत्मविश्वास ढळलेला आहे, अशी उपरोधिक टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी नाशिक मध्ये पत्रकारांशी बोलताना केली. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, नरेंद्र मोदी विचारतात, की मी काय केले? पण १० वर्षांचा त्यांचा स्वतःचा अनुभव घेतला, तर ते ज्या वेळेस गुजरातचे मुख्यमंत्री होते, त्यांच्या राज्यातील शेतीचा कोणताही प्रश्न असला तर ते माझ्याकडे यायचे, मला घेऊन गुजरातला जायचे. त्या वेळी असे झाले, की मी इस्त्राईलला चाललो होतो आणि मोदींनी मला फोन केला. अमेरिकेने त्यांचा त्यावेळेस व्हिसा नाकारला होता. त्यांनी सांगितले, मला इस्त्राईलला तुमच्याबरोबर यायची इच्छा आहे, मी त्यांना घेऊन गेलो. तिथल्या कृषी विषयक गोष्टी त्यांना ४ दिवस दाखवल्या. आज हे सगळे माहीत असताना हल्ली ते जे बोलतात, ते माझ्या मते राजकारण आहे दुसरे काही नाही. ते जेव्हा मुख्यमंत्री होते, तेव्हा त्यांना राज्याच्या विकासामध्ये इंटरेस्ट होता, आता त्यांना राजकारणात इंटरेस्ट आहे, असा खोचक टोलाही यावेळी त्यांनी लगावला. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, बजेटबद्दल नरेंद्र मोदी यांचे स्टेटमेंट मूर्खपणाचे आहे. बजेट हे कोणत्या जाती धर्माचे नसते, पार्लमेंटमध्ये जे बजेट मांडले जाते, ते देशाचे असते. असे असताना ते जे सांगत आहेत, की मुस्लिमांसाठी वेगळा अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा डाव होता तसे ते कधीही होत नाही व होऊ शकत नाही असेही पवारांनी सांगितले. मुंबईतील नरेंद्र मोदी यांच्या रोड शो संदर्भात बोलताना शरद पवार म्हणाले की, मुंबईसारख्या शहरामध्ये 'रोड शो' आयोजित करणे हे शहाणपणाचे लक्षण नाही. लोकांना तासनतास थांबावे लागते, ट्रॅफिक कंडिशन भयंकर होत असते. त्यांनी ज्या ठिकाणी कार्यक्रम घेतला, तो गुजराती परिसर आहे. मला कळत नाही, त्यांना जर रोड शो करायचा होता तर मुंबईमध्ये मोठे रस्ते असलेला परिसर आहे. पण त्यांचे लक्ष एका वर्गातच होते त्याचा लोकांना त्रास झाला व लोकांच्या तक्रारी आल्याचेही त्यांनी सांगितले. शरद पवार साहेब म्हणाले की, जिरेटोप आणि महाराष्ट्राचा इतिहास यांचे काही नाते आहे, जे शिवछत्रपतींसाठी ओळखले जाते. लाचारी असेल, नाही असे नाही, पण त्याची पातळी देखील त्या लोकांनी सोडली. पण एक चांगले झाले, की त्या लोकांनी सांगितलें, की पुन्हा आम्ही याची काळजी घेऊ असा उपरोधिक टोलाही प्रफुल पटेल यांचे नाव न घेता लगावला.

-----------

**राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र**

करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले. शेतकरी हा नैसर्गिक शेतीमागील मुख्य भागधारक असून तो आपल्या कुटुंबासाठी आणि उत्पन्नासाठी शेती करत असतो. रसायनांचा वापर न करता वनस्पती आणि प्राण्यांचे संवर्धन करण्यासाठी स्थानिक विविधतांवर लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेती करावी. महाराष्ट्रात सेंद्रिय कर्बयुक्त मातीचे प्रमाण खूपच कमी आहे. सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविण्यासाठी शेतकऱ्याबरोबर कृषी विभागानेही प्रयत्न करावेत, असे सांगून राज्यातील जास्तीत जास्त क्षेत्र रसायनमुक्त आणि विज्ञानयुक्त अशा नैसर्गिक शेतीखाली आणण्यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील आहे असेही डॉ.गेडाम म्हणाले. श्रीमती रचना कुमार म्हणाल्या, भारत सरकारचा कृषी व शेतकरी कल्याण विभाग नैसर्गिक शेतीबाबतचे धोरण आणि त्याअनुषंगाने परंपरागत कृषी विकास योजनेअंतर्गत कार्यक्रम सर्व राज्यात राबवित आहे. शेतकऱ्याला सेंद्रिय शेतीचे शास्त्रोक्त ज्ञान मिळायला हवे. नैसर्गिक शेती ही केवळ शेती नाही तर ते एक शास्त्रोक्त तत्त्वज्ञान आहे. याचा अवलंब करणे आवश्यक आहे. रासायनिक शेतीचे दुष्परिणाम रोखण्यासाठी शास्त्रोक्त नैसर्गिक शेती का करावी याचे ज्ञान शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. या कार्यशाळेत देशातील विविध ठिकाणाहून आलेल्या अनुभवी व्यक्तींकडून मार्गदर्शन मिळणार आहे. कार्यशाळेत भेटलेल्या ज्ञानाचा अवलंब करा, प्रत्यक्षात कृती करा असे सांगून नैसर्गिक शेतीला प्राध्यान्य देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यशाळेत श्रीमती राणा यांनी सादरीकरणाद्वारे नैसर्गिक शेतीची माहिती सांगितली. या कार्यशाळेस राज्यातील चार कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, केंद्रीय कृषी मंत्रालयातील अधिकारी, महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, केरळ, गोवा, दादरा आणि नगर हवेली आणि दमण व दिव आणि लक्षद्वीप या ८ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील शास्त्रज्ञ, अधिकारी आणि शेतकरी सहभागी झाले आहेत.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## अल्पवयीन मुलीची छेडछाड करणाऱ्या दोन आरोपींना धारूर पोलिसांनी केली अटक

**किल्ले धारूर प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीला छेडछाड करून त्रास देणाऱ्या दोन आरोपी विरोधात धारूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद करण्यात आला होता या गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना धरून पोलिसांनी अटक केली आहे.

अल्पवयीन मुलीची छेड काढून तिला त्रास देणाऱ्या विरुद्ध धारूर पोलीस ठाणे येथे कलम ३५४ ३५४ ३२३ ५०४ ५०६ ३४ सह कलम १२ पोक्सो व इतर कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता या तपासामध्ये तपास अधिकारी श्री कमलेश मीना सह पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी केज यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा गुन्हा दाखल झाला होता या गुन्ह्यातील आरोपी फरार होते फरार आरोपींचा शोध घेण्याचे काम धारूर चे सहायक पोलीस निरीक्षक वाघमोडे पोलीस हेडकॉन्स्टेबल भुसारी, गायसमुद्रे या पथकाने आरोपीचा शोध घेऊन आरोपीतील अविनाश पिंगळे यास १४. ५. २०२४ रोजी व वैभव इंगळे यास १५.०५.२०२४ रोजी अटक करून न्यायालयासमोर हजर केली पुढील तपास पोलीस अधीक्षक कमलेश मीना हे करत आहेत. आरोपीच्या अटकेची कार्यवाही माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना मॅडम अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई सहाय्यक पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी केज यांच्या मार्गदर्शनाखाली डी.पी. वाघमोडे सहाय्यक पोलीस निरीक्षक धारूर तथा पोलीस हेडकॉन्स्टेबल भुसारी व गायसमुद्रे यांनी शोध घेतला. पुढील तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना करत आहेत.

## खरीप तोंडावर ; मागील खरीप विमाच पदरात नाही

**परळी । प्रतिनिधी**

मागील खरीप हंगामात सातत्याने पावसात खंड पडल्याने जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला. शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर २५ टक्के विमा अग्रीम वाटप करण्यात आले मात्र

पिकविम्याची २५ टक्के अग्रीम रक्कम मिळाली पण दुष्काळ जाहीर होवून ६ महिने कालावधी उलटला तरी उर्वरित ७५ टक्के पिकविम्याची रक्कम अदा करण्यात आली नाही.खरिपाच्या तोंडावर ही पिकविम्याची उर्वरित रक्कम मिळावी अशी मागणी आता शेतकरी करत आहे.




राज्य शासनाने मागील वर्षी नव्याने सुरू केलेल्या एक रुपयात पिक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२३ मध्ये इतिहासात पहिल्यांदाच महाराष्ट्रातील एक कोटी ७१ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतला,खरीप २३ मध्ये राज्यातील अनेक महसूल मंडळे पावसाचा दीर्घ खंड, अतिवृष्टी झाल्याने आतापर्यंत अग्रीम अंतर्गत ७० लाख पेक्षा अधिक शेतकऱ्यांना अग्रीम पीक विम्याचा लाभ देण्यात आला असे राज्य सरकार कडून सांगण्यात येते मात्र बीड जिल्ह्यात या अग्रीम वाटपात देखील तफावत आलेली आहे. जिल्ह्यात बोगस शेतकरी असल्याचे सांगत विमा कंपनीकडून अनेक शेतकऱ्यांना अग्रीम दिलेला नाही.विमा कंपनी ने शेतकऱ्यांचे व्हेरिफिकेशन अद्याप देखील केलेले नसून पंचनामा आणि पीक कापणी अहवाल देखील अद्याप पूर्ण केलेले नाहीत. ज्या शेतकऱ्यांचे व्हेरिफिकेशन पूर्ण झाले व पीक कापणी पंचनामा केलेला अहवाल अद्याप कंपनी कडून प्रकाशित करण्यात आलेला नाही.

सोयाबीन, कापूस, तूर या सारख्या पिकावर शेतकऱ्यांचे अर्थकारण अवलंबून असून याच पिकांचे मोठे नुकसान होऊन या शेतकऱ्यांना उर्वरित विमा कधी मिळेल याची प्रतीक्षा लागलेली आहे. मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागल्याने शेतकरी नव्या खरिपाच्या तयारीला लागला असून या खरीप हंगामात पेरणी,खत आणि इतर शेती कामासाठी पैसे नसल्याने उर्वरित ७५ टक्के विमा रक्कम लवकर विमा कंपनीने द्यावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.

> खरीप २०23 मध्ये पावसाचा मोठा खंड आणि नको त्या वेळी पाऊस पडल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. पीक विमा कंपनी कडून २५ टक्के अग्रीमची घोषणा केली.मात्र हे अग्रीम पडताळणी च्या नावाखाली जिल्ह्यात सर्व शेतकऱ्यांना मिळालेला नाही.पीक कापणी अहवाल, बोगस शेतकरी अशी कारणे समोर करून पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक विम्या पासून वंचीत ठेवण्यात आलेले आहे.
>
> ॲड.अजय बुरांडे
> जिल्हा अध्यक्ष किसानसभा, बीड

## विद्युत महामंडळाचा गलथान कारभार; वाकलेले विद्युत खांब जीव गेल्यावर बदलणार काय?

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**सरपंच संदिप खाकाळ यांचा संतप्त सवाल**

तालुक्यातील खाकाळवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या समोरील तसेच ग्रामस्थ नागरिकांच्या रहदारीच्या मार्गावर वाकलेला विद्युत खांब याकडे अनेकवेळा निवेदन देऊन सुद्धा कडा व आष्टी महावितरण कार्यालय व कंपनीचे अक्षरशः कानाडोळा करीत असल्याने येथील शालेय विद्यार्थ्यांना व नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे तसेच सदरील वाकलेला विद्युत खांब कधीही कोसळून पडेल याची शाश्वती देता येत नसल्याचे दिसत आहे .

सदरील विद्युत खांब हा गेल्या अनेक महिन्यापासून विद्युत वहिन्यांसह वाकला असून फक्त ताण दिलेल्या तारेवर पोल उभा राहिला आहे त्याठिकाणी असलेल्या लोकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या रस्त्यासमोरील असणारा विद्युत पुरवठा करणारा हा विद्युत पोल मागील दहा महिन्यांपासून विद्युततारांसह वाकल्या मुळे हा खांब कधीही कोसळून मोठा याठिकाणी शाळेच्या आवारात खेळण्यासाठी आलेल्या चिमुकल्या जीवांना धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही .

या महावितरण कंपनीच्या पोलावरुन जाणारी लाईन एल. टी.आहे जर हा विद्युत पुरवठा करणारा विद्युत खांब कोसळला तर मोठा अनर्थ होऊ शकतो. यासंदर्भात ग्रामपंचायत कार्यलयामार्फत याविषयी अनेकदा फोनवर तसेच लेखी निवेदनाद्वारे कल्पना दिली असून सुद्धा याकडे आष्टी महावितरण अधिकारी व कर्मचारी कानाडोळा केला जात आहे, परंतु याचे महावितरण कंपनीला गांभीर्य नाही काय ? एखाद्याचा जीव गेल्यावर संबधित खात्याला जाग येईल का ? असा संतप्त सवाल सरपंच संदिप खाकाळ यांनी केला आहे .

हा वाकलेले विद्युत खांब रस्त्याच्या बाजुला आहे व रस्त्याने रोज शेतकरी आपल्याला रानात मशागतीच्या कामाला ये-जा करीत असतात अशा वेळी वाकलेले खांब कोसळला तर मोठा अनर्थ होऊ शकतो.असे अनेक विद्युत खांब काही सडलेले व वाकलेले मोडकळीस आले आहेत अथवा ते केव्हाही कोसळू शकतात अशी अवस्था निर्माण झाली आहे एखादी दुर्दैवी घटना महाराष्ट्र विद्युत महामंडळ वितरण कंपनीला टाळायच्या असतील तर याचा गांभीर्याने विचार करून असे विद्युत खांब पावसाळ्यापूर्वी बदलण्यात यावे तसेच या पोलावरून इलेक्ट्रिक तारा हि खाली लोंबकळत आहेत.अशा घटनांमुळे शेरी बु व खाकाळवाडी परिसरात अनेक वेळा गुरेढोरे दगावली आहेत व नंतर लाख मोलाचा जिव गेल्यानंतर पंचनामा करण्यापेक्षा अशी कामे त्वरित केली का जात नाही ? असा संतप्त सवाल सरपंच संदिप खाकाळ यांनी केला आहे. आष्टी महावितरण अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

## १२७ वर्षाच्या आज्जीने बजावला मतदानाचा अधिकार

**पाटोदा । प्रतिनिधी**

लोकशाहीच्या देशात निवडणुका हा उत्सव असतो बीड जिल्हयात ही निवडणूका आनंदात साजरा करण्यात आले आहे. या साठी प्रशासनाने ही चांगली तयारी केल्याचे दिसून आले.लहान मुलांसाठी पाळणाघर ते वयोवृद्ध व विशेष गरजवंत अपंग मतदारांसाठी घरपोच मतदान केंद्र ही सुविधा देण्यात आली होती.पाटोदा तालुक्यातील कारेगाव येथील १२७ वर्षाच्या अश्रफबी हुसेन सय्यद यांनी आपला पवित्र मतदानाचा अधिकार बजावला.यावेळी मतदान केंद्रावर सय्यद सलीम पटेल व त्यांचे सहकारी उपस्थित होते




## तहसील कार्यालयातील डिजिटल इलेक्ट्रॉनिक बोर्ड पडून होऊ शकतो अपघात; तहसील कार्यालयाचे दुर्लक्ष

**किल्ले धारूर प्रतिनिधी**

तहसील कार्यालयाच्या वतीने शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांन पर्यंत पोहोचवण्यासाठी तहसील कार्यालयाच्या आवारात ४० ते ५० फूट उंच माहिती दर्शवण्यासाठी डिजिटल इलेक्ट्रॉनिक बोर्ड उभारला आहे अवकाळी पाऊस व वाऱ्यामुळे बोर्ड एका साईडला झुकला आहे डिजिटल बोर्ड केव्हाही पडून अपघात होऊ शकतो.

नुकतेच काही दिवसापूर्वी झालेल्या अवकाळी पाऊस वादळीवारा यामुळे अनेक ठिकाणी विद्युत खांब झाडे पडून मोठे नुकसान झाले आहे बीएसएनएलचे टॉवर पडून आठ वर्षे मुलीचा मृत्यू झाल्याची घटना त्याची आहे.




धारूर तहसील कार्यालयाच्या आवारामध्ये नागरिकांना शासनाच्या विविध योजना ची माहिती देण्यासाठी तहसील कार्यालयाच्या आवारात उंच डिजिटल इलेक्ट्रॉनिक बोर्ड लावण्यात आला आहे नुकत्याच झालेल्या अवकाळी व वादळी वाऱ्यामुळे बोर्डाचे नुकसान झाले आहे तो बोर्ड केव्हाही जमिनीवर पडून अपघात होऊ शकतो तहसील कार्यालयाच्या आवारात नेहमीच नागरिकांची मोठी गर्दी असते तहसील कार्यालयायांचे कर्मचारी त्या बोर्डाच्या खालून रस्ता असल्याने येजा करतात. वादळी वाऱ्यामुळे डिजिटल बोर्ड एका बाजूला वाकला आहे तो केव्हाही जमिनीवर पडून अपघात होऊ शकतो तहसीलदार लक्ष देऊन तो बोर्ड दुरुस्त करून घ्यावा अशी मागणी तहसीलच्या आवारात येणारे नागरिक करत आहे.

**बीएसएनएलच्या टॉवरची घटना ताजी असताना एका बाजुला झुकलेल्या डिजिटल बोर्ड कडे दुर्लक्ष**

## मंदार धनराज कदम ९९ टक्के गुण घेवून बीड जिल्ह्यात सर्वद्वितीय

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू व्हिजन पब्लिक सीबीएसई स्कुलचा विद्यार्थी चि. मंदार धनराज कदम हा बोर्ड परीक्षेत ९९% गुण मिळवून बीड जिल्ह्यातुन सर्वद्वितीय तर अंबाजोगाई विभागात सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. मंदारच्या यशाबद्दल त्याचे अंबाजोगाई शहर व परिसरातून अभिनंदन केल्या जात आहे.

चि मंदार हा इयत्ता पहिली पासून अंबाजोगाई येथील न्यू व्हिजन पब्लिक सीबीएसई स्कुल येथेच शिक्षणास होता. मंदार याचे वडील बी ए एम एस डॉक्टर असून ते अंबाजोगाई शहरात खाजगी प्रॅक्टिस करतात . मंदार याने त्याच्या यशाचे संपूर्ण श्रेय हे आपल्या गुरुजन व माता पित्याना दिले आहे. अशीच मेहनत व अभ्यास यापुढेही आपण करून पुढील शैक्षणिक वाटचाल करणार असल्याचे मंदार याने सांगितले. चि मंदारच्या यशाबद्दल श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, मार्गदर्शक प्राचार्य बी आय खडकभावी, प्रा वसंत चव्हाण,प्रा दामोदर थोरात, प्रा सुरेश बिराजदार, संस्थेचे प्राचार्य रेंजो आर चंद्रन यांच्यासह अंबाजोगाई शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींकडून अभिनंदन व शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## बीड न.प. मान्सून पुर्वतयारीला केंव्हा लागणार -जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**

साधारणतः सात जुनला आपल्या महाराष्ट्रात मान्सूनच आगमन होत असत. यावर्षी तर अतिवृष्टीचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. दोनतीन आठवडेच शिल्लक असताना बीड नगरपरिषदेच्या स्वच्छता विद्युत आणि पाणीपुरवठा विभागाची मान्सून पुर्व कामाची लगबग दिसून येत नाही.



शहरातील मुख्य नाल्या बरोबरच नदी आणि ओढ्यांची स्वच्छता होणे अपेक्षित आहे. त्याच बरोबर पाणी पुरवठा विभागानेही तत्पूर्वी पाईप लाईनचे लिकेजेस तात्काळ काढून पावसाळ्यात स्वच्छ निर्जंतुक नियमित पाणीपुरवठा करणे अपेक्षित आहे. जेणेकरून पावसाळ्यात उद्भवणाऱ्या सात रोगांवर नियंत्रण मिळवता येईल याच बरोबर सुरक्षेच्या दृष्टीने लोंबकळणाऱ्या तारा उघड्या डिप्या बंद पथदिवे दुरुस्त करून मुख्य रस्त्यां बरोबरच गल्ली-बोळा, लहान-मोठ्या कॉलन्या, वस्त्या प्रकाशमान करणे अपेक्षित आहे. तसे पहाता आपले बीड शहर ऐतिहासिक असल्या कारणाने शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी गजबजलेल्या भागात अनेक जुने वाडे इमारती अस्तित्वात आहेत. अशा वास्तुंचा जीर्ण भाग संबंधीत मालकास नोटीस देऊन उतरुन घेणे अपेक्षित आहे याचं बरोबर बीड शहरातुन वाहत असलेल्या बिंदुसरा आणि कर्परा या मुख्य नद्यां बरोबर ओढे नाले यांच्या स्वचछते बरोबरच पुररेषेतील अतिक्रमणे उठवणे गरजेचे आहे. १९८९ च्या महापुर बीडकर आजही विसरले नाहीत. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात जीवीत आणि वित्तीय हानी झाली होती. त्याची पुनरावृत्ती होता कामा नये यासाठी आपत्ती व्यवस्थापन म्हणून यासर्व कामाला तात्काळ सुरूवात करावी अशी सामान्य नागरीकांची अपेक्षा आहे नगर परिषदेतील वरीष्ठांशी संपर्क साधला असता अद्याप ही कामाला सुरुवात झाली नसल्याचे कळाले असे नगरसेविका सौ. जयश्री विलास विधाते यांनी सांगितले.

## एसएससी परीक्षेत रय्यान मकरानी टॉपर

पाटोदा । प्रतिनिधी

सीबीएससी पॅटर्नच्या झालेल्या एस एस सी परीक्षेत पाटोदा येथील मकरानी रय्यान यांनी ८७-८ टक्के मार्क घेऊन शाळेच्या टॉपर मध्ये यश संपादन केले आहे त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे



रय्यान हा पाटोदा येथील अजीज मोबाईल शॉपी चे मालक अब्दुलअजीज मकरांनी यांचा मुलगा असून जामखेड येथील

पोतदार स्कूल येथे शिक्षण घेत होता एसएससी परीक्षेच्या सीबीएससी पॅटर्न मधून सदर परीक्षा घेतल्या होत्या याचा निकाल दिनांक १३ मे रोजी लागला असून रय्यान मकरानी यांनी टॉपर मध्ये ८७.८ टक्के गुण घेऊन यश संपादन केले आहे यामुळे त्यांचे सर्वस्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

## अंबाजोगाईत शहर वाहतूक शाखेची चाळीस वाहनावर कारवाई







**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरामध्ये फॅन्सी नंबर प्लेट, सायलेन्सर चा मोठा आवाज, चित्र विचित्र हॉर्न वाजवणाऱ्या चाळीस वाहनांवर शहर वाहतूक शाखेच्या वतीने कारवाई करण्यात आली या कारवाई सोबतच दहा बुलेट चे सायलेन्सर काढून घेण्यात आले.

पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे स.पो.नि.सुभाष सानप, वाहतूक अंमलदार उबाळे, पोहेका .नागरगोजे पोहेका. सारुख पोलीस आमदार वाघमारे, पोलीस चालक वाघमारे याबरोबरच अंबाजोगाई पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक घोडके, पोहेका पारवे, गायकवाड, हातागळे आदींनी केली. या कारवाईमध्ये वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या चालकांवर मोटर वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली. काही वाहनांना फॅन्सी नंबर प्लेट लावणे, विना सायलेन्सर वाहन चालवणे, प्रेशर हॉर्न बसवणे अशा ४० वाहनावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्येच दहा बुलेट चे सायलेन्सर काढून घेण्यात आले. या कारवाईचे शहरातील नागरिकांकडून स्वागत होत आहे.

## नृ.पांगरी येथे हरिनाम सप्ताह सोहळ्यास सुरुवात

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यात असलेल्या पांगरी येथे गुरुवार १६ मे रोजी श्री नृसिंह सप्ताहाची मोठ्या थाटात सुरुवात करण्यात आली आहे.पुढील सात दिवस सप्ताहाच्या निमित्ताने काकड आरती,श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा,श्रीमद्? भागवत कथा सोहळा, हरिपाठ संध्याकाळी किर्तन सेवा अशा पद्धतीने नृसिंह सप्ताहाची रूपरेषा तयार करण्यात आली आहे. नृसिंह सप्ताहाचा शेवट गुरुवार २३ मे रोजी काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.या सप्ताह सोहळ्यास पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अखंड हरिनाम सप्ताह सोहळा नृसिंह पांगरी करांच्या वतीने करण्यात येत आहे .




धारूर तालुक्यातील पांगरी येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्त श्रीमद्? भागवत कथा व श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे.तसेच सकाळी काकडा आरती, सायंकाळी हरिपाठ,रात्री किर्तन सेवा असा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.यामध्ये सप्ताहातील कीर्तनकार म्हणून गुरुवार रोजी दीपांजली ताई खिळे,शुक्रवार रोजी ज्ञानेश्वर महाराज कोठुळे,शनिवार रोजी सुनील महाराज गाडेकर, रविवार रोजी इंद्रजीत महाराज रसाळ,सोमवार रोजी सुसेन महाराज नाईकवाडे,मंगळवार रोजी शिवांजली ताई जरांगे, मंगळवार रोजी सायंकाळी नृसिंह जन्मानिमित्त सतीश महाराज शास्त्री,बुधवार रोजी महेश महाराज मडके तर गुरुवार २३ मे रोजी किशोर महाराज कोकाटे देवाची आळंदी यांचे अमृततुल्य कल्याचे कीर्तन व नंतर महाप्रसाद होईल.आठ दिवस भरगच्च कार्यक्रमांचं नियोजन करत नृसिंह पांगरी येथील ग्रामस्थांच्या वतीने या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताह निमित्त कीर्तनकार शिवचरित्रकार तसेच समाजप्रब यांच्या कार्यक्रमाचे आयोजन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नरसिंह सप्ताह समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

पंचक्रोशीतील शेवटचा सप्ताह

पांगरी येथील अखंड हरिनाम सप्ताह हा पंचक्रोशीतील सर्वात शेवटी होणारा सप्ताह म्हणून ओळखला जातो.या सप्ताहास गावातून कामानिमित्त बाहेर गेलेले नागरिक उपस्थित राहतात.तसेच सासरी गेलेल्या मुलीही या सप्ताह कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती लावतात.पंचक्रोशीत सर्व सप्ताहाच्या नंतर पांगरी येथील हा सप्ताह संपन्न झाल्यानंतर शेतकरी शेतीच्या पेरणीपूर्व मशागत कामांना गती देतो ही परंपरा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे.आजही पंचक्रोशीत शेतकरी पांगरी येथील अखंड हरिनाम सप्ताहाच्या समाप्तीनंतरच खऱ्या अर्थाने शेतीच्या कामांना वेळ देतात.

## वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते २४ तारखेला करणार अर्धनग्न अंघोळ आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाणीटंचाई वाढण्यास सुरुवात झाली आहे जिल्ह्यातील पाझर तलाव व अन्य जलाशयांमधील पाणीसाठ्याची अवस्था अतिशय चिंताजनक आहे. बहुतांश तलाव कोरडे पडले आहेत अशी पाण्याची टंचाई पाहता जिल्हाधिकारी बीड यांच्यासह प्रशासनाने उपाययोजना आखणे अपेक्षित होते तसे होताना दिसून येत नाही गंभीर प्रकरणाकडे जिल्हाधिकारी बीड व प्रशासन डोळे झाकपणा करत असल्याचे दिसून येत आहे.

बीड जिल्ह्यात नवीन तहसील कार्यालय बांधकाम, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय बांधकाम, नवीन बसस्थानाक, नवीन जिल्हाधिकारी यांचे निवासस्थान बांधकामसह इतर खासगी बांधकामे जोमात सुरू आहेत बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाचे सुरू असलेले काम यासाठी लाखो-कोटी लिटर पाणी लागणार असून दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने सदरील सर्व कामे तात्काळ थांबविण्यात यावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते अजय सरवदे यांनी निवेदनाद्वारे केली होती. जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित कर्मचारी यांनी विषयाला धरून पत्र काढणे अपेक्षित होते परंतु त्या उलट अडीच महिन्यानंतर पत्र काढून जिल्हा प्रशासन निष्काळजीपणाने वागत असल्याचे दिसून येत आहे. अशा कर्मचाऱ्यावर गंभीर तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याने कारवाई करावी व त्वरित खासगी बांधकामे, सरकारी बांधकामे, राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्गाचे कामे थांबविण्यात यावे अशी मागणी केली असून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २४ मे रोजी अर्धनग्न अंघोळ हे आंदोलन करत प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त करणार असल्याचे वंचितचे युवा नेते अजय सरवदे यांनी सांगितले आहे.

> **जिल्हाधिकारी कार्यालयात आळशी कर्मचारी यांचे प्रमाण वाढले**
>
> जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एखाद्या व्यक्तीने तक्रार दिल्यानंतर त्या तक्रारीची निरसन सात दिवसांमध्ये होणे अपेक्षित असताना त्यासाठी तीन ते चार महिन्याचा वेळ लावला जातो. कर्मचारी सदर तक्रारीकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे कारवाई होण्यास विलंब होतो. कर्तव्यात कसूर करणाऱ्या आळशी कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.

cmyk

cmyk



# उसाच्या पट्ट्यात सफरचंदाची यशस्वी शेती

## अहमदनगरमध्ये झाला अनोखा प्रयोग यशस्वी



पुणे : शेती क्षेत्रात थोडेसे पारंपरिक पद्धतीला फाटा देत काही नाविन्यपूर्ण बदल केले तर नक्कीच फायदा मिळतो. शेतीमध्ये हेच नाविन्यपूर्ण बदल करून, अहमदनगरमधील एका शेतकऱ्याने किमया करून दाखवली आहे. नेवासा तालुका हा तसा उसाचा पट्टा असणारे क्षेत्र आहे. परंतु, या तालुक्यातील देडगाव येथील शेतकऱ्याने आपल्या शेतात सफरचंदाची बाग फुलवली आहे. ज्यामुळे सध्या या शेतकऱ्याच्या यशस्वी सफरचंद शेतीची सर्वदूर चर्चा होत आहे.

आदिनाथ मुंगसे असे या शेतकऱ्याचे नाव असून, ते नेवासा तालुक्यातील देडगाव येथील रहिवासी आहेत. तसे तर सफरचंद म्हटले की आपल्याला काश्मीर आठवतो. पण हेच सफरचंद पीक देडगाव येथील एका शेतकऱ्याने यशस्वी करून दाखवले आहे. ताजी गुलाबी सफरचंदे घेण्यासाठी पंचक्रोशीतून ग्राहक या सफरचंदाच्या बागेला भेट देत आहे.

विशेष म्हणजे काश्मीरसारखे वातावरण नसतानाही आदिनाथ यांच्या बागेत चांगल्या प्रकारे सफरचंद लगडली असल्याने, अनेकांच्या भुवया उंचावत आहेत. सफरचंद हे कश्मीर हिमाचल या थंड प्रदेशातील फळ असून, या फळबागेचा आपल्या परिसरात लागवड करून त्याचे उत्पादन घेण्याचा विचारही आजवर कोणी केला नव्हता. मात्र, देडगावच्या या नवनवीन प्रयोग करणाऱ्या प्रगतिशील युवक शेतकऱ्याने कश्मीरमध्ये येणारे हे फळ आपल्याकडे येऊ शकते का? याचा विचार करून त्याचे उत्पादन घेण्याचे ठरवले. आणि त्यांनी सफरचंद बाग यशस्वी देखील करून दाखवली आहे.

किती मिळतोय दर? : शेतकरी आदिनाथ मुंगसे सांगतात, मागील वर्षीच्या अतिवृष्टीने नुकसान झाले. यंदा मात्र प्रत्येक झाडाला साधारण दहा किलो फळे लागलेली आहेत. फळांचा रंग अतिशय चांगला आहे, चवही चांगली असल्याने आपल्याकडच्या या सफरचंदाच्या बागेचे कुतूहल परिसरातील सर्व शेतकऱ्यांना वाटत असून, या दर्जेदार ताजे सफरचंद घेण्यासाठी सध्या पंचक्रोशीतून या सफरचंदाच्या बागेत ग्राहक येत आहे. जागेवरच व्यापारी शंभर रुपये किलोप्रमाणे ताजे सफरचंद खरेदी करत आहे. यंदाच्या पहिल्याच तोड्यात त्यांना अडीच लाख रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे.

किती आला उत्पादन खर्च? : शेतकरी आदिनाथ मुंगसे यांना २५० रोपांच्या लागवडीसाठी ६५ हजार रुपये खर्च आला आहे. गेल्या तीन वर्षांपासून त्यांना बागेला शेणखतासाठी २५ हजार रुपये, खुरपणी व गवत काढणीचा खर्च एक लाख रुपये आला आहे. त्यांनी २०२१ मध्ये हिमाचल प्रदेशातून हार्मोन ९९ या जातीचे सफरचंदाचे २५० रोपे आणून त्याची ३० गुंठ्यांमध्ये लागवड केली. रासायनिक खताचा वापर न करता केवळ शेण खत वापरून चार वर्षांतच सफरचंदाची झाडे अतिशय चांगली आली असून, २०२३ मध्ये तिसऱ्या वर्षीच या झाडांना फळे लागली होती.

# शेतीसाठी कोंबडी खत उत्कृष्ट

## जाणून घ्या फायदे आणि वापराची पद्धत



जमिनीची कमी होत जाणारी सुपीकता आणि सेंद्रिय कर्बाचे प्रमाण यामुळे जास्तीत जास्त शेतकरी शेतात सेंद्रिय खतांचा वापर करण्याकडे भर देत आहेत. सेंद्रिय खताचे वेगवेगळे प्रकार शेतकऱ्यांना माहित आहेत. त्यामध्ये कोंबडी खत हा एक सहज उपलब्ध होणारा आणि चांगला पर्याय आहे. कोंबड्यांची विष्ठा, कोंबड्यांच्या लिटरसाठी वापरलेला लाकडाचा भुस्सा, साळीचा भुस्सा, शेंगाची टरफले इ. सर्व घटक कुजल्यानंतर तयार झालेला पदार्थ म्हणजे 'कोंबडी खत'

कोंबडी खताचे फायदे : कोंबडी खत वापरल्याने मातीची भौतिक, रासायनिक व जैविक क्षमता सुधारते. बागायती पिके जसे ऊस, फळपिके आणि फुलझाडे कोंबडी खतास चांगला प्रतिसाद देतात. कोंबडी खतामध्ये मुख्यत: १३ अन्नद्रव्ये असतात. त्यात नत्र व स्फुरद जास्त प्रमाणात असते. कोंबडी खतातील नत्र हे अमोनिया, नायट्रेट, युरिक ॲसिड या प्रकारांत आढळते. मुख्य अन्नद्रव्यांव्यतिरिक्त कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, सल्फर, सोडिअम, फेरस, मंगल, मॉलिब्डेनम, बोरॉन, झिंक, कॉपर इत्यादी अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. शेणखतासारखा कोंबडी खतामुळे तणांचा प्रादुर्भाव होत नाही.

कोंबडी खताचा शेतात वापर : मशागतीच्या वेळी पेरणीपूर्वी एक ते दीड महिना अगोदर कोंबडी खत जमिनीत मिसळावे. यानंतर कुळवाची पाळी द्यावी; मात्र ताजे कोंबडीखत उभ्या पिकांत जमिनीत मिसळू नये. उभ्या पिकांत कोंबडीखत जमिनीत मिसळण्यापूर्वी प्रथम त्यावर एक महिना पाणी मारून रापून किंवा थंड होऊ द्यावे म्हणजे कोंबडी खताचे कर्ब, नत्र गुणोत्तर कमी होऊन त्यातील अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध होतात.

कोंबड्यांच्या शेडमध्ये कोंबड्यांची विष्ठा, मूत्र, गव्हांडा किंवा भाताच्या तुसावर पडून खत तयार होते, त्यामुळे ताज्या कोंबडी खताचे कर्ब, नत्र गुणोत्तर जास्त असते. असे खत उभ्या पिकांत जमिनीत मिसळताना ओलावा असणे गरजेचे आहे. जमिनीत पुरेसा ओलावा नसेल तर पीक पिवळे पडते, त्यामुळे ताजे कोंबडीखत थेट पिकांसाठी वापरू नये. उभ्या पिकांत पूर्ण कुजलेले कोंबडीखत वापरावे.

कोंबडी खत कसे असावे?

खताचा रंग भुरकट, तपकिरी, काळपट असावा. वास मातकट असावा खताचा सामू ६.५-७.५ दरम्यान असावा. कोंबडी खताच्या कणांचा आकार ५ ते १० मिमी असावा. कर्ब नत्र गुणोत्तर १:१० ते १:२० दरम्यान असावे. कोंबडी खताची जलधारणाशक्ती ३० टक्क्यांपेक्षा जास्त असावी.

# उसावर होणाऱ्या 'ब्लॅक बग' रोगाचे एकात्मिक नियंत्रण

ऊस पिकात 'ब्लॅक बग' म्हणजेच काळ्या किडीचा प्रादुर्भाव झपाट्याने होत आहे. या किडीचा प्रादुर्भाव साधारणतः एप्रिल ते जून या महिन्यात होतो. ऊस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी त्यांच्या ऊस पिकाची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जाणून घेऊ या किडीचे एकात्मिक नियंत्रण उपाय.


सध्या उसामध्ये या किडीचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता असते, ज्याला काळे बग असेही म्हणतात. यामुळे उसाचे पीक उद्ध्वस्त होऊ शकते. काळे बग या उसामध्ये आढळणाऱ्या किडीचे वेळीच नियंत्रण न केल्यास संपूर्ण पिकाचा नाश होऊ शकतो.

ब्लॅक बग किडीमुळे होणारे नुकसान : काळे किडे ऊस पिकाची पाने आणि देठातील रस शोषून थेट नुकसान करतात. या प्रादुर्भावामुळे पाने कोमेजतात, झाडाची वाढ खुंटते आणि उसाचे उत्पादन कमी होते. शिवाय, काळे बग उसाच्या पिवळ्या पानांचे विषाणू आणि इतर रोगजनकांचा प्रसार करू शकतात, ज्यामुळे पिकाचे होणारे नुकसान वाढते.



एकात्मिक नियंत्रण उपाय : उसाची शेंगा, तृणधान्ये किंवा भाजीपाला यासारख्या पिकासोबत पीक फेरपालट करावी यामुळे या किडीचा प्रादुर्भावास प्रतिबंध होतो. उसाची वेळेवर लागवड, प्रतिरोधक वाणांसह आंतरपीक घेणे, नियमितपणे तण काढणे आणि योग्य माती व्यवस्थापन यासारख्या उपायांमुळे सुद्धा उसामध्ये काळ्या किडींचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यास मदत होऊ शकते. उसावरील ब्लॅक बगचा प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमितपणे पिकांचे निरीक्षण करून सुरुवातीच्या काळातच काळ्या बगचा प्रादुर्भाव शोधणे महत्त्वाचे आहे. यामुळे वेळेवर वेळेवर नियंत्रण उपाय करून होणारे जास्तीचे नुकसान टाळता येते. शेतातील ब्लॅक बगच्या संख्येवर लक्ष ठेवण्यासाठी पिवळे चिकट सापळे किंवा स्वीप नेट वापरावे. या किडीच्या प्रतिबंधासाठी व्हर्टिसिलियम लॅकनी १.१५ टक्के डब्ल्यू. पी. ते ४००-५०० लिटर पाण्यात २.५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणात मिसळून आवश्यकतेनुसार १५ दिवसांच्या अंतराने संध्याकाळी फवारणी करावी. भुंगे, ढेकूण आणि कोळी यासारखे कीटक ब्लॅक बगला खाऊन त्यांचे नियंत्रण करण्यास मदत करतात.

# शास्त्रशुध्द ठिबक सिंचनाने घ्या केळीचे भरघोस उत्पन्न



जोड ओळ पद्धत : केळी पिकास ठिबक सिंचन लावायचे असल्यास लागवड पद्धतीत बदल करणे फायद्याचे आहे. जोडओळ पद्धतीमध्ये शेतामध्ये ९० सें.मी. अंतरावर ट्रॅक्टरच्या सहाय्याने सऱ्या पाडाव्यात. त्यानंतर दोन सऱ्यांमध्ये केळीची रोपे १.५ मी. अंतरावर लावावीत व त्या दोन सर्यामधील वरंबा सपाट करून व लगतच्या सऱ्यांना भर देऊन गादी वाफा तयार करावा. त्यानंतर दोन ओळीमध्ये उपनळ्या टाकून त्यावर १.५ मी. अंतरावर तोट्या बसवाव्यात. अशाप्रकारे दोन ओळींसाठी फक्त एकच उपनळी व दोन समोरासमोरील रोपांसाठी एकच तोटी वापरून उपनळ्या व तोट्यांच्या खर्चात निम्म्याने बचत करता येते. वरीलप्रमाणे दोन सऱ्यात केळीची लागवड केल्यानंतर पुन्हा दोन सर्या रिकाम्या सोडाव्यात व नंतर लगतच्या सर्यामध्ये पुन्हा केळीची लागवड करावी. अशाप्रकारे दोन उपनळ्यांमध्ये ३.६ मी. तर दोन जोडओळीतील २.७ मी. इतके अंतर राहते. या पद्धतीचे वैशिष्ट्ये म्हणजे दोन ओळींमध्ये ट्रॅक्टर किंवा बैल वापरून आंतरमशागत करता येऊन खर्चातही बचत करता येते.

सलग लागवड पद्धत : नेहमीच्या पद्धतीने (१.५१.५ मी.) केळीची लागवड केली असता प्रत्येक ओळीसाठी एक उपनळी व प्रत्येक झाडासाठी एक तोटी द्यावी लागत असल्यामुळे ठिबक सिंचन संच बसविण्यासाठी सुरुवातीचा जोड ओळ पद्धतीपेक्षा १५-२० हजार रुपये जास्त खर्च करावा लागतो. परंतु नेहमीच्या पद्धतीत प्रति हेक्टरी ७ ते ८ टन उत्पादन जास्त मिळते व ठिबक पद्धतीसाठी करावा लागणारा अतिरिक्त खर्च भरून निघतो. म्हणून या नेहमीच्या १.५१.५ मी. अंतरावरील लागवड पद्धतीची ठिबकखालील केळीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे.

केळीसाठी सुध्दा ठिबक सिंचन संचातून विद्राव्य खतांच्या मात्रा दिल्या असता ३९ टक्क्यांपर्यंत उत्पादनामध्ये वाढ व २० टक्के खतांची बचत झाल्याचे आढळून आलेले आहे. केळीचे अधिक उत्पादन आणि पाण्याच्या व खतांच्या कार्यक्षम वापरासाठी शिफारशीत खत मात्रेच्या (२००:४०:२०० नत्र स्फूरद पालाश ग्रॅम/झाड) ८० टक्के खते विद्राव्य स्वरुपात १८ हप्त्यात पंधरवड्याच्या अंतराने तक्ता क्र. ५ प्रमाणे दिल्याने ३९ टक्क्यांपर्यंत उत्पादनामध्ये वाढ व २० टक्के खतांची बचत झाल्याचे आढळून आलेले आहे.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६६ : अमेरिकेत पाच सेन्ट किंवा निकेल हे नाणे व्यवहारात आणले.
१८९९ : क्रांतिकारक बाळकृष्ण चाफेकर यांना फाशी.
१२०४ : बाल्डविन नववा पहिला लॅटिन सम्राट झाला.
१६०५ : पॉल पाचवा पोपपदी.
१९१८ : अमेरिकेत सरकारवर टीका करणे हा तुरुंगवासास पात्र गुन्हा ठरवण्यात आला.
१९२० : पोप बेनेडिक्ट पंधराव्याने जोन ऑफ आर्कला संत ठरवले.
१९२९ : हॉलिवूडच्या ॲकेडमी ऑफ मोशन पिक्चर, आर्ट्स अँड सायन्सेस या संस्थेतर्फे चित्रपटांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल स्मृतिचिन्ह देण्याचा पहिला समारंभ झाला. याच पारितोषिकांना पुढे ऑस्कर असे नाव पडले.
१९६९ : सोवियेत संघाचे अंतराळयान व्हेनेरा ५ शुक्रावर उतरले.
१९७५ : सिक्कीममधील जनतेने कौल दिल्यावर भारताने सिक्कीमला देशाचा भाग करून घेतले.
१९७५ : जुन्को ताबेई एव्हरेस्टवर चढणारी प्रथम स्त्री ठरली.
१९९३ : बचेन्द्री पालच्या नेतृत्वाखालील पहिल्या महिला भारतीय मोहिमेने सात मुलींसह अठरा गिर्यारोहकांना एव्हरेस्ट पादाक्रांत करण्याचा मान मिळवून दिला व नवा जागतिक विक्रम नोंदविला.
१९९२ : स्पेस शटल एन्डेव्हरची प्रथम अंतराळयात्रा सफल.
१९९६ : भारताचे १० वे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांनी सूत्रे हाती घेतली. मात्र आवश्यक पाठिंबा न मिळाल्यामुळे त्यांचे सरकार केवळ १३ दिवस टिकले.
२००० : बॅडमिंटन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी तसेच खेळांचे दूरचित्रवाणी प्रसारण सुलभ करण्यासाठी या खेळातील गेम १५ ऐवजी ७ गुणांचा करण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाच्या क्वालालंपूर येथील बैठकीत घेण्यात आला. मात्र २००६ मधे हा नियम परत बदलला गेला.
२००५ : कुवेतमधे स्त्रियांना प्रथमच मतदानाचा हक्क प्राप्त झाला.
२००५ : अमेरिकन वैज्ञानिकांनी क्लोन केलेल्या मानवी भ्रूणाच्या शरीरातून स्टेम पेशी काढण्यात पहिल्यांदा यशस्वी झाले.
२००७ : निकोलाय सारकॉझी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२५ : आद्य गणिती, आधुनिक भास्कराचार्य केरुनाना लक्ष्मण छत्रे यांचा जन्म. (मृत्यू: १९ मार्च १८८४)
१८३१ : मायक्रोफोन चे सहसंशोधक डेव्हिड एडवर्ड ह्यूजेस यांचा जन्म. (मृत्यू: २२ जानेवारी १९००)
१८२४ : महान गणितज्ज्ञ केरो लक्ष्मण छत्रे यांचा जन्म
१८५७ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पटना येथील २७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष रघुनाथ मुधोळकर यांचा जन्मदिन.
१९०५ : अमेरिकन अभिनेते हेन्री फोंडा यांचा जन्म. (मृत्यू: १२ ऑगस्ट १९८२)
१९२६ : माणिक वर्मा, शास्त्रीय व सुगम संगीत गायिका.
१९३१ : के. नटवर सिंग, भारतीय परराष्ट्र मंत्री.
१९४१ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय टक्करवादक बनामाली महाराणा यांचा जन्मदिन.
१९४४ : महाराष्ट्रातील एक प्रसिध्द लोकनेते अभयसिंह राजे भोसले यांचा जन्म
१९५३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय बायोफिजिकल वैज्ञानिक प्राचार्य रामकृष्ण विजयाचार्य होसूर यांचा जन्मदिन.
१९५५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय हातमाग उद्योजक गजम अंजैया यांचा जन्मदिन.
१९७० : गॅब्रियेला सॅबाटिनी, आर्जेन्टिनाची टेनिस खेळाडू.
१९७५ : निरोशन बंदरतिलके, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६५ : पुरंदर किल्ला लढविताना मराठेशाहीतील स्वामीनिष्ठ सरदार मुरारबाजी देशपांडे यांचे प्राणार्पण
१८३० : फ्रेन्च गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ फोरियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १७६८)
१९२६ : महमद सहावा, शेवटचा ओस्मानी सम्राट.
१९५० : कोल्हापूर संस्थानचे दिवाण व शिक्षणमंत्री अण्णासाहेब लठ्ठे यांचे निधन. (जन्म: ९ डिसेंबर १८७८)
१९७७ : माली देशाचे पहिले अध्यक्ष मादीबो केएटा यांचे निधन. (जन्म: ४ जुन १९१५)
१९९० : द मपेट्स चे जनक जिम हेनसन यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९३६)
१९९४ : माधव मनोहर, लेखक, समीक्षक.
१९९४ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक फणी मुजुमदार यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १९११ फरिदपूर, बांगला देश)
२००० : माधव गोविंद काटकर, मराठी कवी.
२००८ : ओपस वन व्हाइनरी चे सहसंस्थापक रॉबर्ट मोन्डवी यांचे निधन. (जन्म: १८ जुन १९१३)
२०१४ : टाटा स्टीलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक रुसी मोदी यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९१८)

# केशरला सोन्याचा भाव! 1 किलोसाठी मोजावे लागताहेत ४.९५ लाख रुपये

पुणे : राज्यासह देशभरातील केशर उत्पादकांना सुगीचे दिवस आले आहेत. गेल्या काही काळापासून अनेक जण राज्यात बंदिस्त वातावरणात केशर लागवड करताना आढळून आले आहेत. विशेष म्हणजे त्यांना गुणवत्तापूर्ण केसर उत्पादन मिळवण्यात यश देखील आले आहे. अशातच आता भारतीय केशरच्या किंमतीत प्रचंड वाढ झाली आहे. सध्या १ किलो भारतीय केशरसाठी तब्बल ४.९५ लाख रुपये मोजावे लागत आहेत. हे दर गेल्या काही महिन्यातच २० ते २७ टक्क्यांनी वाढले आहेत. त्यामुळे नव्याने केशर उत्पादन मिळवत असलेल्या उत्पादकांसाठी ही आनंदाची बातमी मानली जात आहे.

पश्चिम आशियातील भू-राजकीय तणावामुळे इराणमधून केशरच्या पुरवठ्यात मोठी घट झाली आहे. इराण हा जगातील सर्वात मोठे केशर उत्पादक देश आहे मात्र तेथील उत्पादनात घट झाल्याने जागतिक बाजारपेठेत केशरची टंचाई निर्माण झाली आहे. भारतासह अनेक देश इराण मधूनच केशर आयात करतात. त्यामुळे पुरवठा कमी झाल्याने, भारतातील केशरला मागणी वाढली असून, परिणामी केसरच्या किंमतीत देखील मोठी वाढ झाली आहे.

भारतात अनेक ठिकाणी केशरचे उत्पादन होते. मात्र, काश्मीर केशराला सर्वाधिक मागणी आहे. काश्मीर केशरचा दर्जा उत्तम मानला जातो आणि त्याची चव आणि सुगंधही अप्रतिम असतो. त्यामुळे काश्मीर केशरची किंमत इतर केशरच्या तुलनेत जास्त असते. भारत यूएई, यूएसए, ऑस्ट्रेलिया, नेपाळ आणि कॅनडा या देशांना केशरचा पुरवठा करतो. केशरचा वापर अनेक पदार्थांमध्ये केला जातो. मिठाई, पदार्थ, चहा आणि कॉफीमध्ये केशर टाकून त्याची चव आणि सुगंध वाढवला जातो. तसेच केशर औषधी गुणधर्मांसाठीही प्रसिद्ध आहे

भारतातील उत्पादनातही घट: इराणमधील पुरवठ्यात घट झाली मात्र भारतातील केशर उत्पादनातही यंदा घट झाली आहे. जम्मू-काश्मीर हे भारतातील सर्वात मोठे केशर उत्पादक राज्य आहे. मात्र राज्यात हवामानातील बदलांमुळे केशर उत्पादनात घट झाली आहे. भारतीय केशरला जगभरात मागणी आहे. सध्या सण आणि उत्सव जवळ येत आहेत. आणि या काळात केशरची खरेदी वाढते. त्यामुळे मागणी वाढल्याने आणि पुरवठा कमी झाल्याने केशरच्या किंमतीत वाढ झाली आहे.



cmyk

# मान्सुन पुर्व तयारीची कार्यप्रणालीसह यंत्रणने सज्ज राहावे: अपर जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

मान्सुन पुर्व तयारीची आवश्यक कार्यप्रणालीस यंत्रणेने सज्ज राहावे, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी आज झालेल्या बैठकीत दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात मान्सुन २०२४ पूर्वतयारीबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी त्यांनी निर्देश दिले. मुख्यकार्यकारी अधिकारी अविनाश पाठक हे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. तसेच प्रत्यक्ष बैठकीस अपर जिल्हाधिकारी, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजदीप बन्सोड तसेच काही विभागाचे अधिकारी ही प्रत्यक्ष उपस्थित होते. यासह सर्व उपविभागीय अधिकारी, गट विकास अधिकारी, तहसीलदार, नगर पालीकाचे मुख्य अधिकारी, आणि आवश्यक त्या विभागाचे कार्यलयीन प्रमुख अथवा सहायक दूर दृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीस उपस्थित होते.



अपर जिल्हाधिकारी यांनी या आढावा बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित आणि दूर दृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना सांगितले, मान्सुन पुढील महिण्याच्या पहिल्या आठवडयात दाखल होणार असून यासाठी पुर्वतयारीची आवश्यक कार्यप्रणाली प्रत्येक विभागाच्या हाती असावी. नैसर्गिक आपत्ती ही कधीही येऊ शकते. वेळेवर यंत्रणांची तारांबळ न उडावी, नागरीकांचे हाल होऊ नये यासाठी यंत्रणेने सज्ज राहावे. तसचे सर्व विभागाने यंत्रणेने त्यांचे आवश्यक कार्यप्रणालीचा अहवाल शुक्रवार दि. २४.मे २०२४ पर्यंत जिल्हा व्यवस्थापन विभागास सादर करावी, असे निर्देशित केले. ज्या यंत्रणाकडे आपत्ती व्यवस्थापनाचे साहित्य असतील त्यांनी त्यांच्याकडे असणाऱ्या साहीत्यांची शहानीशा करून घ्यावी, आवश्यक ते साहित्य नसल्यास तशी मागणी नोंदवावी. सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त असणाऱ्या यंत्रणेचा बैठका घेऊन पुर्व तयारीचा आढावा घ्यावा. गोदावरी, सिंदफणा, बिंदुसरा या नदयांच्या किनारी असणाऱ्या लोकवस्तींना सावधगीरीच्या सुचना आधीच देण्यात याव्यात, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी श्री पाठक यांनी संपुर्ण यंत्रणेला केले. तसेच पुर नियंत्रण कक्ष २४ तास सक्रीय राहतील त्यांचे संपर्क क्रमांक सुरू असतील आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे त्यांची माहिती असेल जेणे करून नागरीकांना वेळोवेळी सावध करता येणार अशा सुचनाही केल्या.आरोग्य विभागाने प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये औषधांची कमतरता भासणार नाही याबाबत काळजी घ्यावी. तसेच आरोग्य पथके सज्ज ठेवावी. साथीचे, जलजन्य अथवा पावसाच्या पाण्याने होणाऱ्या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी पाण्याची तपासणी करून घ्यावी, पशु संवर्धनांची काळजी घ्यावी, मान्सुन दरम्यान गांवामध्ये होणाऱ्या यात्रा/ जत्रे दरम्यान विष बाधा होणार नाही याबाबत योग्य दक्षता घेऊन तशी कार्यवाही करून अहवाल सादर करावे, अशा सुचना श्री. कुलकर्णी यांनी यावेळी केल्या.

बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणारे रस्त्यांची डागडुजी करून घेणे, नगरपालीका विभागाच्या अंतर्गत येणारे रस्ते, नाल्याची सफाई, धोका दायक इमारतींना नोटीस, अनाधिकृत फलक काढून टाकणे, तसेच नगरपालीकेतील आपत्ती व्यवस्थापन पथक २४ तास सक्रीय राहतील यांची काळजी घेणे. नैसर्गिक अथवा अन्य आपत्तीच्या काळात विद्युत सेवा कोलमडणार याची नाही काळजी घेणे महावितरण विभागाने तसेच प्रतिबंधात्मक कारवाईचे व्यवस्थापन करावे, अशा सुचना केल्या. पुढील महिण्यात शाळा सुरू होणार असून विद्यार्थ्यांना मिळणारे अन्न नीट असावे याचे निर्देश प्राथमिक शिक्षण अधिकारी यांना दिले. अंगनवाडया दुरूस्त करून घेणे अथवा पर्यायी व्यवस्था करने. अशा सुचना यावेळी करण्यात आल्या. आतापासुन योग्य दक्षता घेतली गेल्यास आपत्तीच्यावेळी लगेच प्रतिसाद देऊन परीस्थिती नियंत्रणात आणता येईल, असेही श्री कुलकर्णी यावेळी म्हणाले.

---

# दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील फळबागा जगविण्यासाठी शासनाने मदत करावी

## मराठवाडा पाणी परिषदेची आग्रहाची मागणी

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यात यावर्षी अल्प प्रजन्यमानामुळे भूजल पातळी खालावलेली असून पाण्याअभावी फळबागा जळुन चालल्या आहेत त्यामुळे फळबागा तोडाव्या लागत आहेत. त्यातच ९ ते १४ एप्रिल २०२४ दरम्यान मराठवाड्यातील काही भागात झालेल्या अवकाळी गारपीट पावसामुळे मोठ्या प्रमाणात फळबागाचे नुकसान झाले आहे. सरसकट सर्व फळबागधारक शेतकऱ्यांचे पंचनामे करून प्रति हेक्टरी एक लाखाची मदत करावी अशी निवेदनाद्वारे मागणी मराठवाडा पाणी परिषदेचे बीड जिल्हा प्रमुख बाजीराव ढाकणे यांनी केली आहे. शासनाने मदत नाही केल्यास मराठवाड्यातील फळबागा नामशेष होतील व ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडून पडेल. शासनाने त्वरित फळबाग धारक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रती हेक्टरी एक लाखाची मदत करावी याबाबतचे कृषी सहसंचालकांना निवेदन देण्यात आले, यावेळी मराठवाडा पाणी परिषदेचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे, बीड जिल्हा प्रमुख बाजीराव ढाकणे उपाध्यक्ष मनोहर सरोदे, रविंद्र बोडके, रविंद्र सातदिवे, अनिल चौधरी, भाऊसाहेब मते, संदीप शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.मराठवाड्यातील फळबागा जगविण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलली पाहिजेत तरच फळबागा जगतील अशी मागणी मराठवाडा पाणी परिषदचे बाजीराव ढाकणे यांनी केली आहे.मराठवाड्यातील अनेक फळबागा पाण्या अभावी जळुन चालल्या आहेत. सरकारने या फळबागांना टँकर द्वारे पाणी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी मराठवाडा पाणी परिषदचे बाजीराव ढाकणे यांनी केली आहे.

मराठवाड्यातील फळबागा जगविण्यासाठी सरकारी पातळीवर उपाययोजना केल्या पाहिजेत अन्यथा ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडेल मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी फळबागा हे नगदी व हमखास उत्पन्न देणारे साधन आहे. कृषी उद्योगांना कच्चा माल देण्याचे काम फळबाग धारक शेतकरी करत असतात. परंतु मराठवाड्यातील सततच्या दुष्काळाची परिस्थिती आणि फळ पिकांवरील रोगराई यामुळे फळबागायतदार शेतकरी त्रस्त आहे. दुष्काळाच्या छायेत सापडलेल्या फळबाग धारकांना शासनामार्फत आर्थिक मदत झाली पाहिजे तरच मराठवाड्यातील फळबागा वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना दिलासा मिळेल नसता सर्व फळबागा नामशेष होतील म्हणजेच मराठवाड्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडेल

बाजीराव ढाकणे बीड जिल्हा प्रमुख, मराठवाडा पाणी परिषद



---

# स्मशानभूमी अभावी अंत्यसंस्कार करताना वाद ही लाजीरवाणी बाब

## मात्र लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला सोयरसुतक नाही

बीड । प्रतिनिधी

आयुष्यभर संघर्ष केल्यानंतर निदान मृत्यु तरी सुखासुखी व्हावा अशी सर्वसामान्य माणसांची ईच्छा असते मात्र मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना त्यांच्या अंत्यविधीसाठी संघर्ष करावा लागतो.वेगवेगळ्या समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी आहेत.तर काही ठिकाणी स्मशानभूमीची दुरावस्था झालेली आहे.काही ठिकाणी काटेरी झुडुपातुन वाट काढत दहनशेडकडे जावे लागते. ग्रामीण भागातील स्मशानभूमीची अवस्था मरणासन्न असुन जागेअभावी काहींना शेतात, उघड्यावर किंवा नदीकाठी अंत्यसंस्कार करावे लागत आहेत. बीड तालुक्यातील पालवण येथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याच्या कारणावरून वाद झाला.मागासवर्गीय समाजाच्या स्मशानभूमीचे बांधकाम झालेले नसल्याने सार्वजनिक स्मशानभूमीमध्ये वादविवाद होऊन अखेर गुन्हा दाखल झाला आहे. यानिमित्ताने स्मशानभूमीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



केज तालुक्यातील सोनेसांगवी (सुर्डी) गावातील दि.४जाने २०२२ लक्ष्मी शहाजी कसबे वय ६५ ,दि.११ एप्रिल २०२२ रोजी नंदुबाई नामदेव थोरात वय ५० वर्षे,दि.२६ एप्रिल २०२२ रोजी अंबुबाई काशीनाथ साखरे वय ७५ वर्षे यांचे ४ महिन्यात ३ वेळा मागासवर्गीय महिलांचे अंत्यसंस्कार रोखण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यावेळी नातेवाईकांनी मृतदेह केज तहसिल कार्यालयात आणुन ठेवला होता. गेवराई तालुक्यातील सुशी (वडगाव) गावात दि.२१ डिसेंबर २०२३ रोजी तुळशीराम कलेढोण वय ५४ वर्षे यांचा मृतदेह गावातील लोकांनी सरकारी ओढ्यात अंत्यसंस्कार करण्यास विरोध केल्याने ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठेवण्यात आला होता. बीड जिल्ह्यातील १३९४ पैकी ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोय नसल्यामुळे पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड होत असुन अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था झाली असुन अंत्यसंस्कार दरम्यान काही गावांमध्ये वादविवाद होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडत असल्याने तातडीने उपाययोजना करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर "पिंडदान आंदोलन" "सरण रचुन सरणावरती ठिय्या आंदोलन" "मृतदेह शासन दारी" आदि लक्ष्यवेधी आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष्य वेधण्याचा प्रयत्न केला मात्र लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन यांना स्मशानभूमी अभावी मृतदेहाची हेळसांड आणि गावात वादविवाद होत असताना सोयरसुतक नसल्याचे दिसून येत आहे.

---

# गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान व सत्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इयत्ता दहावी सीबीएसईच्या विद्यार्थ्यांचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यात अंबाजोगाई शहरातील न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांना घवघवीत असे यश संपादन केले आहे. यशवंत विद्यार्थ्यांमध्ये ९९% गुण मिळवत मंदार कदम हा बीड जिल्ह्यातून सर्वद्वितीय आल्याबद्दल तर त्याच्यासह इतर गुणवंत विद्यार्थ्यांचा देखील सत्कार व सन्मान संस्थेच्या वतीने करण्यात आला. या सत्कार समारंभ प्रसंगी संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्राचार्य बी आय खडकभावी, संस्थेचे प्राचार्य रेंजो आर चंद्रन, प्रा सुरेश बिराजदार, धनराज सोळंकी, संचालिका डिंपल मोदी यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.




या सत्कार समारंभात प्राचार्य बी आय खडकभावी यांनी संस्थेच्या गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतांना सर्व गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेली नियोजनबद्ध अभ्यास व मेहनत यामुळे विद्यार्थी हे यश संपादन करू शकले आहेत. त्यांच्या यशात त्यांच्या गुरुजन व माता पित्यांचा देखील तेवढाच मोठा वाटा असल्याचे खडकभावी यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी यापुढे त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी विचारपूर्वक निर्णय घेण्याचा सल्ला देखील याप्रसंगी त्यानी दिला. संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी देखील संस्थेच्या सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी मागील १२ वर्षापासून १००% निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवल्याबद्दल आनंद व अभिमान व्यक्त केला. बीड जिल्ह्यात सर्व द्वितीय तसेच अंबाजोगाई विभागात ९९% गुण घेऊन सर्वप्रथम आलेला मंदार कदम याचे विशेष असे कौतुक करत त्यांच्यासोबतच आर्यन जाधव, अब्दुल शेख, अथर्व राऊत, श्रेया गेवारे, व स्नेहल भताने या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. पुढे बोलताना राजकिशोर मोदी उपस्थित गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांना म्हणाले की त्यांनी त्यांच्या आयुष्यातील पहिला प्राथमिक टप्पा पूर्ण केला आहे. त्यांच्या जीवनातील खरा संघर्ष व मेहनतीचा दुसरा टप्पा आता सूरू झाला असून या महत्वाच्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी आपल्यातील कौशल्य विकसित करण्यासाठी कस लागणार आहे. यापुढील शैक्षणिक जीवनात जीवघेण्या स्पर्धा व संघर्षाला सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी कायम चिकित्सक, मेहनती व संघर्षमय रहावे लागणार असल्याचे यावेळी राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. कायम अभ्यासू राहा, अशा सदिच्छा व्यक्त करतांना यापुढेही श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ हे कायम आपल्यासोबत राहणार असून विद्यार्थ्यांना येणाऱ्या कुठल्याही अडचणीचे निराकरण करण्यासाठी आपली संस्था व संस्थेतील संपूर्ण शिक्षक तथा प्राध्यापक सदैव तत्पर राहतील असा विश्वास याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी व पालकांना राजकिशोर मोदी यांनी दिला.

---

# राऊतमारे कुटुंबावर झालेल्या हल्याचा अंबाजोगाईत निषेध



अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रतिनिधी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड येथील पिंपरगव्हाण रोड येथे ब्राह्मण कुटुंबावर ( अशोक राऊतमारे) मतदान करण्यावरून झालेल्या अमानुष अत्याचाराच्या निषेधार्थ गुरुवारी येथील सकल ब्राम्हण समाजाच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन उप जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. गेल्या अनेक दिवसांपासून ब्राम्हण समाजावरील अत्याचार वाढले आहेत. परिणामी समाज भयभीत झाला आहे.दोन दिवसांपुर्वी बीड येथील पिंपरगव्हाण रोड येथे ब्राह्मण कुटुंबावर ( अशोक राऊतमारे) मतदान करण्यावरून जीव घेणा हल्ला करण्यात आला. या घटनेचा निषेध व्यक्त करत,या घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा करावी. या मागणीचे निवेदन सकल ब्राह्मण समाजा च्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर, प्रभाकर शेलमुकर, मकरंद सोनेसांगवीकर, राहुल कुलकर्णी,डॉ संकेत तोरंबेकर, शिरीष हिरळकर अक्षय देशमुख , विशाल जहागीरदार, दीपक कुलकर्णी ,ॲड वैजनाथ वांजरखेडे,विवेक देशमुख,महेश कुलकर्णी, अनिकेत कुलकर्णी, सचिन कन्नडकर, डॉ कौस्तुभ कुलकर्णी, तेजस हसेगावकर, राहुल सारणीकर, मंदार काटे, अमोल विडेकर, संजय देशपांडे, अभय जोशी, विवेक वालेकर, दुर्गादास दामोशन यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

---

# ग्रामपंचायतने मागितलेली माहिती न दिल्याने जलसमाधी घेण्याचा इशारा

## सोनीजवळा ग्रामपंचायतीकडे मागितली होती माहिती

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील सोनीजवळा ग्रामपंचायत मध्ये गेल्या दहा वर्षाच्या काळात ग्रामपंचायतीने गावात कामे न करता मोठ्या प्रमाणात भ्रस्टाचार केल्याने ग्रामपंचायतने केलेला भ्रस्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी सोनीजवळा येथील शिवसेना शिंदे गटाच्या युवा नेत्याने ग्रामपंचायतीकडे केलेल्या कामाची लेखी माहिती मागवली मात्र ग्रामपंचायतीने माहिती न दिल्याने ग्रामपंचायती समोर आमरण उपोषण केले असता माहिती देण्याचे आश्वासन देत उपोषण मागे घेण्यास भाग पाडले मात्र दोन महिने लोटून हि ग्रामपंचायत मागितलेली माहिती देत नसल्याने ग्रामपंचायतीकडे मागितलेली माहिती मिळविण्यासाठी शुक्रवार दिनांक १७ मे रोजी जिल्ह्यातील कोणत्याही तलावात जलसमाधी घेण्याचा इशारा निवेदनाद्वारे केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दिला आहे.

केज तालुक्यातील सोनीजवळा ग्रामपंचायतीने मागील दहा वर्षाच्या काळात गावात कामे न करता कामे केल्याचे दाखवत लाखो रुप्याच्या निधीचा भ्रस्टाचार केला. गावात कामे न करताच ग्रामपंचायतीच्या तत्कालीन सरपंचाने विकासनिधीच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रस्टाचार केल्याने या बाबत सोनीजवळा येथील शिवसेना शिंदे गटाचे युवा नेते शिवाजी रामदास गायकवाड यांनी ग्रामपंचायतीने गावात कामे न करताच विकास निधी हडप केल्या बाबत आवाज उठवत ग्रामपंचायतीकडे रीतसर केलेल्या कामाची माहिती मागितली मात्र ग्रामपंचायतीने ती दिल्याने मागितलेली माहिती न दिल्याने सोनीजवळा ग्रामपंचायती समोर सोमवार दिनांक ११ मार्च २०२४ रोजी आमरण उपोषण केले असता ग्रामपंचायतीने माहिती देण्याचे आश्वासन देत आमरण उपोषण मागे घेण्यास भाग पाडले मात्र आमरण करून हि ग्रामपंचायतीने माहिती न दिल्याने शिवाजी गायकवाड यांनी केज पंचायतीचे गटविकास अधिकारी यांना दिनांक २९ एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनात सोनीजवळा ग्रामपंचायतीचे १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०२३ या दहा वर्षाच्या कालावधीत केलेले लेखा परीक्षण अहवालाची सत्यप्रत देण्यात यावी ,नमुना नंबर १ ते ३३ देण्यात यावे , मागील दहा वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालावर लेखा परीक्षकांनी काढलेली त्रुटी व त्या मध्ये केलेल्या सुधारणा या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती , लेखा परीक्षणाचा अहवाल ग्रामसभेत सादर केला असल्यास त्याची सत्यप्रत आदी संदर्भात मागणी केली आहे सदरील मागणी पूर्ण न झाल्यास शुक्रवार दिनांक १७ मे २०२४ रोजी जिल्ह्यातील कोणत्याही तलावात किंवा जलस्रोतात जलसमाधी घेण्याचा इशारा निवेदनाद्वारे सोनीजवळा येथील शिवसेना शिंदे गटाचे युवा नेते शिवाजी गायकवाड यांनी केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी याना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

### मागणीकडे गटविकास अधिकाऱ्याचे दुर्लक्ष

तालुक्यातील सोनीजवळा येथील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या शिवसेना युवा नेत्याने गावात ग्रामपंचायतीने मागील दहा वर्षाच्या काळात केलेल्या भ्रष्टाचाराची माहिती मागण्यासाठी ग्रामपंचायती समोर आमरण उपोषण करून हि माहिती दिली नाही याबाबत त्यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे हि माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे करून हि गटविकास अधिकारी यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या युवा नेत्यास माहिती मिळविण्यासाठी जलमाधवी घेण्याची वेळ आहे. जेथे मुख्यमंत्र्यांच्या कार्यकर्त्यास माहिती दिली जात नाही तेथे सर्व सामान्य जनतेचे काय असा सवाल सर्वसामान्यातून चर्चिला जात आहे.

---

# जागतिक परिचारिका दिन साजरा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील परिचर्या महाविद्यालयामध्ये जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. परिचारिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांची जयंती जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरी केली जाते. त्यांना आभिवादन करून या कार्यक्रमाची सुरवात झाली. त्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

वैद्यकीय क्षेत्रात परिचारिकांची भूमिका फार महत्त्वाची आहे आणि त्या जबाबदारीने ही आरोग्य यंत्रणा सांभाळत असून अनेक आव्हानांना सामोरे जात, जीवाची बाजी लावत परिचारिकांनी रुग्णहित साध्य केले आहे.हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. दीपप्रज्वलन, प्रार्थना व मान्यवरांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांनी सर्व प्रशिक्षणार्थी परिचारिकाचे कौतुक केले व त्यांच्या कार्याला प्रोत्साहन दिले. या दिननिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या यामध्ये रांगोळी, पोस्टर, नृत्य, गायन, समूह नृत्य, संगीत खुर्ची आदींचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये सर्व विद्यार्थी पाठ्यनिर्देशक यांनी उस्फूर्त सहभाग घेतला होता. हा कार्यक्रम स्वामी रामानंद तीर्थ नर्सिंग कॉलेजच्या सभागृहात पार पडला.सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य रमेश भोंडवे, पाठ्यनिर्देशक नाझिया मॅडम, रुपाली इंगळे सह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# पंकजा मुंडे यांना मताधिक्य मिळावे यासाठी आ. धसांनी केला आटापिटा

## मराठा बांधवानी मतदान करावे गावोगावात जाऊन केली विनंती



शिरूर । शंकर भालेकर

**बीड लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाच्या उमेदवार पंकजा मुंडे व राष्ट्रवादीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे दोन जातीतील दोन उमेदवार आमणे -सामने आल्याने बीड जिल्ह्यात जातीपातीच्या राजकारणाला मोठा ऊत आला होता. परिणामी या निवडणुकीमध्ये मोठी चुरस निर्माण झालेली पाहायला मिळाली, यामुळे सहाजिकच भाजपांच्या नेत्यांना मराठा समाजाचे मतदान मिळवणे कठीण झाले होते असे असताना पंकजा मुंडे यांना निवडून आणण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावरती घेऊन आष्टी - पाटोदा -शिरूर हा विधानसभा मतदार संघ आ. सुरेश धसांनी पिंजून काढत मतदारांच्या दारोदारी जाऊन पंकजा मुंडेना मताधिक्य मिळावे यासाठी मतदार बांधावा साकडे घातले होते. मतदान मिळवण्यासाठी कधी नाही ते यावेळी त्यांना जीवाचा आटापिटाही करावा लागला आहे.**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून बीड जिल्ह्यातील मराठा समाज बांधव मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात ज्या नेत्यांनी उदासीनता दाखवली आहे त्या नेत्यांना गावांमध्ये फिरू द्यायची नाही अशी भूमिका सकल मराठा बांधवांच्या वतीने घेण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागल्यानंतर भाजपाच्या गोटातून माजीमंत्री पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली. भाजपाने ओबीसीचा नेतृत्व करणाऱ्या नेत्याला उमेदवारी दिल्याने ही उमेदवारी मराठा बांधवांच्या जिव्हारी लागली. पंकजा मुंडे यांच्या विरोधात राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने तगडा उमेदवार द्यावा अशी मानसिकता मराठा बांधवांमध्ये निर्माण झाली.

### सामाजिक सलोखा जोपासण्याचे आवाहन

लोकसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया आता पार पडली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुण बांधवांनी अक्षपार्ह व द्वोष मत्सर निर्माण करणारे पोस्ट करून सामाजिक शांतता भंग करू नये. सर्वांनी गुण्यागोविंदाने नांदावे असे आवाहनही जिल्ह्यामध्ये सर्वप्रथम आ. सुरेश धस यांनी केले आहे.

राष्ट्रवादीकडून बजरंग सोनवणे यांच्या उमेदवारीनंतर बीड जिल्ह्यामध्ये राजकारणाचे पुन्हा समीकरणे बददलून गेली. लोकसभा निवडणुकीमध्ये मराठा विरुद्ध ओबीसी असा राजकीय पॅटर्न निर्माण झाल्यामुळे आपसूकच बीड जिल्ह्यामध्ये पुन्हा एकदा जातीपातीच्या राजकारणाला ऊत आलेला पहायला मिळाला आहे. यामुळे या निवडणुकीमध्ये प्रचंड चुरस निर्माण झालेली पहायला मिळाली. अनेक गावांमध्ये भाजपांसह महायुतींच्या नेत्यांना मराठा बांधवांनी गावामध्ये येण्यासाठी मज्जाव केला. असे असतानाही आष्टी - पाटोदा- शिरूर विधानसभा मतदारसंघांमध्ये पंकजा मताधिक्य मिळावे यासाठी संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढून आ.सुरेश धस यांनी मतदार बांधवांच्या दारोदारी जाऊन पंकजा मतदान करण्याचे साकडे घातले. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून कधी नव्हे तर यावेळी मराठा मतदार बांधवांकडून ऐकून घ्यावे लागले आहे. अनेक ठिकाणी तर तुम्ही आम्हाला यावेळी काही सांगू नका असे स्पष्टही बोलण्यात आले.असे असतांना आ. सुरेश धस यांनी आपल्या प्रयत्नाची पराकाष्टा करत महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना मतदान करण्याची विनंती केली होती. एवढेच नाही तर मतदानाच्या दिवशी गावागावा मध्ये जाऊन प्रत्येक मतदान बूथ वरती आपले लक्ष ठेवून मतदान मिळवण्यासाठी मोठा प्रयत्न केला. आ.सुरेश धस यांच्या या प्रयत्नाला कितपत यश येते हे निकालानंतरच कळणार आहे असे असले तरी त्यांनी भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे मताधिक्य मिळावे यासाठी केलेला प्रयत्न सध्यातरी राजकीय वर्तुळामध्ये चर्चेचा विषय बनला आहे.



# भाजपचे सरकार कायम राहणार नाही

कोलकाता

लोकसभा निवडणुकीसाठी मतदानाचे चार टप्पे झाले असून तीन टप्पे बाकी आहेत. नेत्यांचे एकमेकांवरील आरोप-प्रत्यारोप सातत्याने सुरू आहेत. अशातच पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली. भाजप सरकार कायम टिकणार नाही, आज नाही तर उद्या मी नक्कीच बदला घेणार असा धमकी वजा इशारा त्यांन दिला.



पश्चिम बंगालच्या हल्दिया येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी नंदीग्राममध्ये आपला पराभव करण्यासाठी निवडणूक निकाल बदलण्यात आल्याचा आरोपही केला. त्या म्हणाल्या, मी तुम्हाला विधानसभा निवडणुकीदरम्यान नंदीग्रामबद्दल सांगितले आहे. माझी फसवणूक झाली, मते लुटली गेली, हेराफेरी झाली. निवडणुकीपूर्वी डीएम, एसपी, आयजी बदलण्यात आले आणि निवडणुका संपल्यानंतर लोडशिंडग करुन निकाल बदलले. भाजपचे सरकार कायम राहणार नाही. ईडी, सीबीआय नेहमी त्यांच्यासोबत नसतील. मी आज ना उद्या बदला नक्की घेईन असा इशारा त्यांनी दिला. यासोबतच त्यांनी पश्चिम बंगालमधील जनतेला काँग्रेस आणि सीपीआयएमला मतदान न करण्याचे आवाहन करत या दोन्ही पक्षांचे लोक भाजपकडून पैसे घेत असल्याचा आरोप केला. त्या म्हणाल्या सीपीआयएम आणि काँग्रेस बंगालमध्ये निवडणूक लढवण्यासाठी भाजपचा पैसा वापरत आहेत. त्यांना एक मतही देऊ नका. आमच्या पक्षाचा आघाडीशी संबंध नाही. केंद्रात इंडियाचे सरकार आल्यावर बाहेरुन पाठिंबा देऊ, पण राज्यात आम्ही सोबत नाही असे स्पष्टीकरणही त्यांनी यावेळी दिले.

# राहुल गांधींची २४ पक्षांची खिचडी, फडणवीस यांची टीका

मनमाड । प्रतिनिधी

सध्या भारतात महाभारताच्या युद्धासारखी स्थिती आहे. एकीकडे पांडव सेना आणि दुसरीकडे कौरव सेना आहे. त्यात राहुल गांधींची २४ पक्षांची खिचडी आहे.



त्यांच्याकडे पंतप्रधान पदाचा उमेदवार नाही, अशी टीका करतानाच, आपल्या विकासाच्या गाडीचे इंजीन मोदी आहे. सर्वांना घेऊन विकासाची गाडी पुढेही अशीच सुरू ठेवण्यासाठी देशाला नरेंद्र मोदी यांची गरज असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महायुतीच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांच्या प्रचारार्थ शहरातील ऋषी वाल्मीकी स्टेडियमवर आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री पंकजा मुंडे, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, आमदार सुहास कांदे, अंजुम कांदे, माजी आमदार राजेंद्र देशमुख, संजय पवार, फरहान खान यांच्यासह शिवसेना, भाजप, रिपाइं, मनसे यांसह महायुतीतील घटक पक्षांचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# कांदाप्रश्नी कायमस्वरूपी उपाययोजनाची भुजबळांची मागणी

नाशिक । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या कांदा निर्यातीबाबतच्या धोरणामुळे राज्यातील विशेषतः नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.



महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पिंपळगाव बसवंत येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा पार पडली. या सभेप्रसंगी भुजबळ यांनी पंतप्रधान मोदी यांच्यासोबत चर्चा करून त्यांना मागणीचे पत्र दिले. या पत्रात म्हटले आहे की, देशातील एकूण उत्पादनाचा ६० ते ७० टक्के कांदा महाराष्ट्रात पिकतो. तर, राज्याच्या एकूण कांदा उत्पादनाच्या तुलनेत ६० टक्के कांद्याचे उत्पादन एकट्या नाशिक जिल्ह्यात होते. कांद्याच्या भावाचा परिणाम हा शेतकऱ्यांच्या जीवन मरणाशी निगडित असल्याने दरवर्षी त्याचे राजकीय पडसाद दिसून येतात. वेळोवेळी कांद्याच्या किमान निर्यात दरातील वाढीचा किंवा निर्यातबंदीचा जिल्ह्यातील कांदा निर्यातीवर विपरीत परिणाम झाला आहे. केंद्र सरकारच्या या धोरणामुळे निर्यातदारांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड द्यावे लागते. त्यातच निर्यातबंदी आणि किमान निर्यातमूल्यमधील वाढ यामुळे कांदा मातीमोल भावाने विकावा लागतो.

# मुस्लिमांशी नाते घट्ट म्हणणाऱ्या नरेंद्र मोदींचे पुन्हा मुस्लीम द्वेषावरच भाषण -नाना पटोले

मुंबई । प्रतिनिधी

मोदी सरकारने कधीच कोणाला धर्म विचारला नाही व धर्माच्या नावावर योजनाही राबवल्या नाहीत. मुस्लीमांशी आपले नाते घट्ट आहे व मतांसाठी आपण काम करत नाही असे सांगणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा जाहीर सभेत राम मंदिर व मुस्लीम द्वेषावर भर देऊन लोकांची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला, आता देशातील जनता नरेंद्र मोदींच्या थोपेबाजीला बळी पडणार नाही, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी काँग्रेस पक्षाच्या जाहिरनाम्यावर सातत्याने बिनबुडाचे आरोप करत आहेत. मुस्लीमांना संपत्ती वाटणार हे काँग्रेसच्या जाहीरनाम्यात कुठेच नाही हे स्पष्ट असतानाही नरेंद्र मोदी पुन्हा पुन्हा काँग्रेस मुस्लीमांना संपत्ती वाटणार असा अपप्रचार करत आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावरही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर केलेले आरोप धादांत खोटे आहेत. आरक्षणाला आरएसएस व भाजपाचाच विरोध आहे उघड असताना काँग्रेस एस.एस., एस.टी. व ओबीसींचे आरक्षण काढून मुस्लीमांना देणार या आरोपात काहीही तथ्य नाही. पंतप्रधान पदावरील व्यक्तींनी काहीतरी ताळतंत्र ठेवून बोलावे अशी अपेक्षा असते पण आरएसएसच्या खोटे पसरवण्याच्या शिकवणीतून नरेंद्र मोदी यापेक्षा वेगळे काही बोलू शकतील असे वाटत नाही. काँग्रेसवर मुस्लीम तुष्टीकरणाचे आरोप करणाऱ्या नरेंद्र मोदी यांच्या भाजपाने आंध्र प्रदेशात चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगु देसमशी युती केली आहे. याच तेलुगु देसमने हज यात्रेसाठी १ लाख रुपयांची मदत करण्याचे आश्वासन दिले आहे हे मोदींना कसे चालते? असा सवाल केला. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले की, घाटकोपर भागात होर्डिंग दुर्घटनेत १६ नागरिकांचा बळी गेला आहे, मुंबईकरांसाठी हा एक मोठा धक्का आहे परंतु भाजपा व नरेंद्र मोदी यांना या घटनेचे काहीही गांभिर्य नाही, ज्या घाटकोपर भागात ही घटना घडली त्याच भागातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा रोड शो होतो हे संताप आणणारे आहे यातून पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपाची असंवेदनशीलता दिसून येते, असा आरोपही यावेळी केला.

# अपक्षांना मिळणाऱ्या मतांवर ठरणार नाशिकचे गणित

नाशिक । प्रतिनिधी

महायुतीत आधी तिकिटावरून आणि पाठोपाठ मानापमान नाटपावरून रंगलेली नाशिकची लढत आत्ता निर्णायक वळणावर घेऊन ठेपली आहे. महाविकास आघाडी उमेदवार आत्मविश्वासपूर्वक जिंकण्याचे दावे करत असताना दुसरीकडे महायुतीची कमान सांभाळत राज्य नेतृत्वाने विविध समाज घटकांना आपलेसे करण्याचा धडाका लावला आहे. चौरंगी स्वरूपातील या लढतीत अपक्ष शांतिगिरी महाराज आणि वंचित उमेदवार किती मजल मारतात, यावर इथल्या विजयाचे प्रमेय ठरणार आहे.



हेमंत गोडसे | राजाभाऊ वाजे | शांतिगिरी महाराज | करण गायकर

नाशिक मतदार संघात हेमंत गोडसे (महायुती), राजाभाऊ वाजे (महाविकास आघाडी), शांतिगिरी महाराज (अपक्ष) आणि करण गायकर (वंचित आघाडी) हे प्रमुख उमेदचार नशीच आजमावत आहेत. वाजे यांची उमेदवारी सर्वात आधी जाहीर झाल्याने त्यांनी प्रचाराची एक फेरी केव्हाच पूर्ण केली. त्यांच्या उमेदवारीवरून फारशी नाराजी नसल्याने आघाडीतील तीनही घटकपक्ष जोरकसपणे त्यांच्या प्रचारात उतरले आहेत, तथापि, महायुतीचे गोडसे यांच्याबाबत स्वपक्षासह (शिंदे गट) भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटात पहिल्यापासून नाराजी असल्याने ती दूर करण्यात स्वतः गोडसे यांच्यासह तीनही पक्षाच्या राज्य नेतृत्वाला ऊर्जा खर्च करावी लागत आहे. तब्बल दोन लाखांहून अधिक भक्त परिवार असल्याचा दावा करणाऱ्या महंत शांतिगिरी महाराज यांनी राष्ट्रभक्तीसाठी उमेदवारी दाखल केल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे त्यांच्याकडे लक्ष लागून राहिले आहे. राजकारण्यांना दूर सारत यावेळी मतदार धर्मसत्तेला कौल देतील, असा विश्वास महाराजांच्या समर्थकांकरवी व्यक्त करण्यात येत आहे. भक्त परिवाराने एकगठ्ठा मते पदरात टाकली, तर दोन प्रमुख उमेदवारांच्या जय पराजयाचे गणित बिघडू शकते. निवडणूक रिंगणात उत्तरलेल्या वंचितच्या गायकर यांनीही मराठा दलित असा सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग यावेळी यशस्वी होण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. या मतदार संघात सर्वाधिक मतदान मराठा समाजाचे असून, दलित मतदारांची संख्या दोन लाखांपेक्षा अधिक आहे.

# लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या चार टप्प्यात ६६.९५ टक्के मतदान

नवी दिल्ली । वृत्तसेवा

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या चार टप्प्यात एकूण मतदान ६६.९५% इतके नोंदवले गेले आहे, निवडणूक आयोगाने गुरुवारी सांगितले की, सध्या सुरू असलेल्या निवडणूक अभ्यासात सुमारे ९७ कोटी मतदारांपैकी ४५.१० कोटी मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.



केंद्रीय निवडणूक आयोगाने जारी केलेल्या एका निवेदनात, मतदान पॅनेलने मतदारांना येत्या टप्प्यात मोठ्या संख्येने बाहेर पडून मतदान करण्याचे आवाहन केले आहे. निवडणूक आयोगाच्या मते, १३ मे रोजी झालेल्या मतदानाच्या चौथ्या टप्प्यातील अद्ययावत मतदान ६९.१६% होते, जे २०१९ च्या संसदीय निवडणुकीतील संबंधित टप्प्यापेक्षा ३.६५ टक्के जास्त होते. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदानाची अद्ययावत आकडेवारी ६५.६८% इतकी होती. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात ६८.४% मतदान झाले. २६ एप्रिल रोजी झालेल्या निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात, २०१९ च्या मतदानाच्या दुसऱ्या टप्प्यातील ६९.६४% च्या तुलनेत ६६.७१% मतदान झाले. सध्या सुरू असलेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ६६.१४% मतदान झाले. २०१९ च्या निवडणुकीत पहिल्या टप्प्यात ६९.४३% मतदान झाले होते. निवडणूक आयोगाने सांगितले की, संसदीय निवडणुकीच्या उर्वरित तीन टप्प्यांमध्ये मतदारांना माहिती देणे, प्रेरित करणे आणि सुविधा देणे यावर भर दिला जात आहे आणि राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उपाय योजना करण्यास सांगितले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, ''आयोगाचा ठाम विश्वास आहे की भागीदारी आणि सहयोग हे मतदार जागृती कार्यक्रमाचे अत्यावश्यक आधारस्तंभ आहेत. आयोगाच्या विनंतीनुसार, विविध संस्था, प्रभावशाली आणि लक्षणीय पोहोच असलेले सेलिब्रिटी प्रो-बोनो तत्त्वावर उत्साहाने काम करत आहेत हे पाहणे खरोखर आनंददायक आहे.''

निवडणुकीच्या पहिल्या चार टप्प्यात २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील एकूण ३७९ जागांवर मतदान झाले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार पुढे बोलताना म्हणाले, भारतीय मतदारांकडून भारतीय लोकशाहीच्या सामर्थ्याबद्दल जगाला एक संदेश असेल. मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस नसून लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होण्याचा अभिमानाचा दिवस असल्याने मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावे, असे आवाहन केले.

# नाशिक लोकसभेची उमेदवारी मिळवण्यात राष्ट्रवादी अपयशी, मात्र...

नाशिक । प्रतिनिधी

लोकसभा मतदारसंघाचा तिढा महायुतीत अनेक दिवस सुरु होता. शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटात जोरदार रस्सीखेच सुरु होती. मात्र अगदी शेवटच्या क्षणी महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी महत्वाचे भाष्य केले आहे.



नाशिक लोकसभा मतदारसंघात २० मे रोजी मतदान पार पडणार आहे. नाशिकच्या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे नाशिकमध्ये दाखल झाले. त्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधला.

नाशिकमधून उमेदवार घोषित करायला उशीर झाला

सुनील तटकरे म्हणाले की, एनडीएचे आम्ही घटक आहोत. राहिलेल्या तीन दिवसात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी प्रचार करण्यासाठी बैठक झाली आहे. नाशिकमधून उमेदवार घोषित करायला उशीर झाला हे निश्चित आहे. आम्ही भाजप व सेनेच्या पाठीशी राहणार आहोत. आतापर्यंत विरोधात निवडणूक लढलो आहोत. मात्र आता महायुतीत असल्याने अखेरच्या टप्यात सगळ्यांनी सक्रिय होण्याच्या सूचना दिल्या आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शुक्रवार दि.१७ मे २०२४ | पान ७

# सुरक्षित आणि हरित पालखी सोहळ्यासाठी सूक्ष्म नियोजन करा- जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी पाणी, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था, रस्ते, रस्ता सुरक्षा, आरोग्य सुविधा आदी सर्व सोयी सुविधा योग्य पद्धतीने उपलब्ध करून देण्यासह सुरक्षित आणि हरित पालखी सोहळ्यासाठी सर्व यंत्रणांनी आतापासून सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थान आणि संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान पालखी सोहळ्याबाबत पूर्वतयारी आढावा बैठक डॉ. दिवसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आदी उपस्थित होते.

यंदा वेळेवर पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला असल्याचे सांगून डॉ. दिवसे म्हणाले, पावसाची स्थिती लक्षात घेऊन आवश्यक सुविधा करण्यात याव्यात. पावसाळा लक्षात घेता स्वच्छता आणि आरोग्याचा परस्पर संबंध असल्याने तात्पुरत्या शौचालयाच्या स्वच्छतेवर विशेष लक्ष द्यावे. स्वच्छतेच्या नियोजनासाठी स्वतंत्र नियंत्रण अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. पालखी सोहळा जगातील सर्वात शिस्तबद्ध असणारा सोहळा आहे. आपण अशा सोहळ्याचे भागीदार आहोत या भावनेने सोहळ्यासाठी आपले योगदान द्यावे. पालखीला टँकरने पाणीपुरवठा होणाऱ्या सर्व स्रोतांची



तपासणी करावी. आवश्यक ती निर्जंतुकीकरणाची औषधे, दवाखान्यांमध्ये औषधे उपलब्ध ठेवावीत. पाणीपुरवठ्याचे टँकर आणि शौचालयांच्या संख्येत वाढ कण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. पालखीच्या रस्त्यावर कोठे अतिक्रमणे असल्यास ती तात्काळ काढून टाकण्यात यावीत. आपत्कालीन व्यवस्थेसाठी नगरपालिकेकडील लायटिंग टॉवरचा उपयोग पालखी दरम्यान करण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

आरोग्य आणि स्वच्छतेशी संबंधित कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेऊन याबाबत आदर्श कार्यपद्धती तयार करावी. वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात यावी. शहरातील स्वच्छता आणि आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात यावी. त्यासाठी शहरातील तज्ज्ञ डॉक्टरांची बैठक घेऊन त्यांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेच्यावतीने करण्यात आलेल्या नियोजनाची यावेळी सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. स्वच्छता, पिण्याचे शुद्ध पाणी, तात्पुरते शौचालय, आरोग्य तपासणी, पालखी तळाचे सपाटीकरण, इंधन आणि वीज पुरवठा, शोषखड्डे, तात्पुरता निवारा केंद्र, आरोग्य किट आदींची माहिती यावेळी देण्यात आली.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी १ हजार ५००, संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी १ हजार आणि संत सोपान महाराज पालखी सोहळ्यासाठी २०० शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे. १४० रुग्णवाहिका आणि ५७ रुग्णवाहिका पथक, ११२ वैद्यकीय अधिकारी, ३३६ आरोग्य अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्यासाठी २०० टँकरची व्यवस्था करण्यात येणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले. बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी महानगरपालिका, संबंधित उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी यांच्यासह भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, अन्न व औषध प्रशासन, महावितरण आदी विभागांकडून पूर्वतयारीचा आढावा घेतला. बैठकीस श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान, श्री संत तुकाराम महाराज देवस्थान, श्री संत सोपानदेव महाराज देवस्थान, श्री संत चांगावटेश्वर महाराज देवस्थान, श्री निळोबाराय देवस्थान पदाधिकारी, संबंधित तालुक्यांचे तहसीलदार, आरोग्य विभाग, पोलीस, अग्निशमन विभाग, पशुसंवर्धन विभाग, परिवहन विभाग, राज्य मार्ग परिवहन महामंडळ आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



# जलसंपदा विभागाच्या जागेत होर्डिंग

**खडकवासला | प्रतिनिधी**

पुणे शहराच्या मध्यवर्ती भागापासून खडकवासला धरण ते उरुळी कांचनपर्यंत खडकवासला जलसंपदा (पाटबंधारे) विभागाच्या जागेत अनेक वर्षांपासून उभे असलेले सर्व बेकायदेशीर होर्डिंग हटविण्याचा आदेश न्यायालयाने देऊनही अनेक महिन्यांपासून होर्डिंग मुख्य सिंहगड रस्ता, पानशेत रस्ता, मुठा कालव्यासह दाट लोकवस्ती, प्रचंड वाहतूक कोंडी होणार्या चौकात अजूनही बिनदिक्कतपणे उभे आहेत. सर्वांत गंभीर स्थिती सिंहगड रस्त्यावर आहे. खडकवासला धरणापासून नांदेड फाटा, किरकटवाडी, धायरी, वडगाव, राजाराम पूल, पर्वतीपर्यंत मुठा कालव्यावर धोकादायक होर्डिंग उभे आहेत.

नांदेड, धायरी फाटा आदी ठिकाणी होर्डिंग कोसळून दुर्घटना घडल्यानंतरही पुन्हा त्या ठिकाणी होर्डिंग उभे राहिले आहेत. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जलसंपदा विभागाच्या जागेतील होर्डिंग काढण्यात यावेत, असे पत्र खडकवासला जलसंपदा विभागाने पालिकेला दिले आहे. मात्र, प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नसल्याचे गंभीर चित्र पुढे आले आहे. जलसंपदा विभागाच्या जागेत बेकायदा होर्डिंग उभे करणार्या होर्डिंग व्यावसायिकांविरोधात जलसंपदा विभागाने न्यायालयात धाव घेतली होती.

खडकवासला जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता मोहन भदाणे म्हणाले, जलसंपदा विभागाच्या मालकी जागेत खडकवासला धरणापासून ते उरुळी कांचनपर्यंत असलेले बेकायदा होर्डिंग हटविण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. आठ-नऊ महिन्यांपूर्वी याप्रकरणी होर्डिंग्ज व्यावसायिकांविरोधात न्यायालयाने निकाल दिला होता. त्यानुसार पालिका प्रशासनाला संबंधित होर्डिंग्ज हटविण्याचे पत्रही त्या वेळी दिले आहे. अद्यापही होर्डिंग उभे असल्याने पुन्हा एकदा पत्र दिले जाणार आहे.

# भिंत उकरून बिबट्याचा शेळ्यांवर हल्ला; दोन्ही शेळ्यांचा मृत्यू

**शिरूर | प्रतिनिधी**

पोल्ट्रीच्या शेडमध्ये बांधलेल्या शेळ्यांना पाहून बिबट्याने चक्क भिंत उकरून आत प्रवेश केला आणि हल्ला केला. यामध्ये दोन शेळ्यांचा मृत्यू झाला. टाकळी हाजी (ता. शिरूर) येथे मंगळवारी (दि. १४) रात्रीच्या सुमारास हा प्रकार घडला.



शेतकरी रामदास कारभारी घोडे यांनी घराजवळच पोल्ट्रीचे शेड बांधले आहे. त्यामध्ये कोंबड्या नसल्याने त्यांनी तेथे शेळ्या बांधलेल्या होत्या.

शेडसाठी खालच्या बाजूस दोन फुटांचे विटांचे बांधकाम केले असून, त्यावर तारेची जाळी लावलेली आहे. मंगळवारी रात्री शेडमध्ये शिकार दिसल्याने बिबट्याने विटांचे बांधकाम उकरून आत प्रवेश केला व शेळ्यांवर हल्ला केला. यादरम्यान तेथेच झोपलेले घोडे यांच्या कामगारास जाग आली व त्यांनी आरडाओरडा केल्याने बिबट्याने पळ काढला. मात्र, या हल्ल्यात दोन शेळयांचा मृत्यू झाला. वन विभागाच्या कर्मचार्यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला. वन विभागाने पशुधनावरील हल्ले रोखण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच हल्ले झालेल्या शेतकर्यांना तत्काळ नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी टाकळी हाजीचे माजी सरपंच दामूशेठ घोडे यांनी केली.

# ‘वंश’ लघुपटाला दादासाहेब फाळके महोत्सवात पुरस्कार

## देश-विदेशातील महोत्सवांमध्ये विविध पुरस्कारांवर नोंदवले नाव

**पुणे | प्रतिनिधी**

प्रतिभावंत कथालेखक जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेवर आधारित सावी आर्टस्? आणि वाईड विंग्ज मीडियातर्फे निर्मिती करण्यात आलेल्या ‘वंश’ या लघुपटाला दिल्ली येथे झालेल्या १४व्या दादासाहेब फाळके महोत्सवातील शानदार सोहळ्यात सन्मानित करण्यात आले आहे. देशासह विदेशातील विविध चित्रपट महोत्सवांमध्ये ‘वंश’ लघुपटाने अनेक पुरस्कारांवर आपली मोहोर उमटविली आहे.

दादासाहेब फाळके यांच्या जयंतीनिमित्त १४व्या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन दिल्ली येथे करण्यात आले होते. त्यात लघुपट या विभागात ‘वंश’चा गौरव करण्यात आला. अपत्य नसणाऱ्या स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन, स्त्रीत्वाला दिली गेलेली दुषणे आणि घराण्याला वंश हवा अशा पैलूंवर भाष्य करणारा हा लघुपट आहे. अभिनेत्री डॉ. वरदा जाधव आणि निर्माते गणेश जाधव यांनी पुरस्कार स्वीकारला.

जी. ए. कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या ‘वंश’ या कथेवर आधारित लघुपटाची निर्मिती करण्यात आली आहे. अभिनेत्री डॉ. वरदा जाधव यांची प्रमुख भूमिका असून प्रसिद्ध अभिनेते किशोर




कदम यांचीही महत्त्वपूर्ण भूमिका आहे. लघुपटाचे दिग्दर्शन ऋषी मनोहर यांचे असून निर्मितीची बाजू गणेश जाधव यांनी सांभाळली आहे. पटकथा आणि संवाद गौरव बर्वे यांचे आहेत. पुष्कर झोटिंग सिनेमॅटोग्राफर असून कुशल खोत प्रोडक्शन मॅनेजर आहेत. लघुपटाच्या निर्मितीत जी. ए. कुलकर्णी यांच्या भगिनी नंदा पैठणकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

‘वंश’ लघुपट देश तसेच विदेशातील न्यूयॉर्क, न्यू जर्सी, सिंगापूर यासह अनेक चित्रपट महोत्सवांमध्ये प्रदर्शित झाला असून विविध पुरस्कारांचा मानकरीही ठरला आहे. ‘वंश’ लघुपटाला द कलकत्ता इंटरनॅशलन कल्ट फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट लघुपट, निर्मिती आणि संकलन तसेच उत्तम पटकथेसाठी पुरस्कार मिळाला आहे. शिलाँग येथील ग्रीन अकॅडमीतर्फे सर्वोत्कृष्ट लघुपट, कलकत्ता इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट उल्लेखनिय भारतीय लघुपटाचा पुरस्कारही मिळाला आहे. पुणे येथील मुंबा इंटरनॅशलन शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट छायाचित्रणासाठीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. न्यूयॉर्क लाँग आयलंड फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट परकीय भाषेतील चित्रपटाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. आग्रा येथील ग्लोबल ताज इंटरनॅशलन फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि लघुपटाचा मानही मिळाला आहे. तसेच न्यू जर्सी येथील मराठी इंटरनॅशनल फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट स्त्री कलाकार तसेच सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

‘वंश’ची कथा स्त्रीपात्राभोवती फिरते आहे. कागदावरील पात्रे पडद्यावर उभे करण्यात वेगळा आनंद मिळाला आहे. लघुपट हेच माध्यम या कथेसाठी योग्य वाटल्याने तो केला, असे ऋषी मनोहर यांनी सांगितले.स्त्री पात्राभोवती कथा फिरत असल्याने भूमिका नेमकेपणाने साकारण्याचा प्रयत्न केला असल्याचे डॉ. वरदा जाधव म्हणाल्या.

# दारू पिल्यानंतर दोन मित्रांमध्ये वाद डोक्यात दगड मारल्याने एक गंभीर जखमी

**लोणी काळभोर | प्रतिनिधी**

दोन मित्रांमध्ये किरकोळ कारणांवरून दारू पिल्यानंतर झालेल्या वादाचे पर्यावसन भांडणात झाल्याने एकाचे डोक्यात दगड व लोखंडी हुकाने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील माळीमळा परिसरात मंगळवार (१४ मे) रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी गुलाब सतीश परदेशी (वय ३२) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून अंकुश बाजीराव मगर (वय ५५, दोघे रा. माळीमळा लोणीकाळमोर ता. हवेली, जि. पुणे) याचेविरोधांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार गुलाब परदेशी व अंकुश मगर हे दोघे मित्र आहेत. दोघांनाही दारूचे व्यसन आहे. परदेशी हे मोलमजुरी करून तर मगर हे लोणी काळभोर येथील सिमेंटच्या मालधक्क्यात हमाल म्हणून काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मंगळवारी परदेशी यांना मगर याने दारू पिण्यासाठी बोलावून घेतले. दोघेही मद्यधुंद झालेनंतर तुझ्या खिश्यामध्ये काय आहे? असे म्हणून परदेशी याने मगर याच्या अंगाशी झटापट केली. याचा राग आल्याने मगर याने गुलाब परदेशी याला शिवीगाळ केली.

त्यानंतर मगर याने त्याच्या हातात असलेल्या सिमेंट पोती उचलण्याच्या हुकाने परदेशी याच्या डाव्या हाताच्या कोपऱ्याच्या आतील बाजूस मारुन दुखापत केली. तसेच डोक्यात दगड मारुन जखमी केले आणि तुला दोन दिवसात मारुन टाकतो अशी धमकी दिली. या प्रकरणी परदेशी याने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात अंकुश मगर याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार केतन धेंडे करीत आहेत.

# शिरूरमध्ये परवानगीविनाच होर्डिंग! प्रशासनाला जाग येणार तरी कधी?

**शिरूर | प्रतिनिधी**

शिरूर शहर हद्दीत नगरपरिषदेच्या हद्दीत विनापरवाना होर्डिंग्ज लावले असून,




नगरपरिषदेकडे एकाही परवानगीची नोंद नाही. इतकी वर्षे बेकायदेशीरपणे व शासनाचा महसूल हे होर्डिंगमालक बुडवत आहेत. शिरूर शहर हद्दीत सतरा कमानी पूल ते पाषाण मळापर्यंत नगरपरिषदेची हद्द आहे. या हद्दीत साधारण १० मोठे होर्डिंग्ज लावले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून हे होर्डिंग बिनधास्तपणे उभे आहेत, तसेच त्यांच्यावर लाखो रुपयांच्या जाहिराती झळकतात. त्यापोटी शासनाला कर भरणे आवश्यक असते; मात्र तो कर या होर्डिंगधारकांनी न भरता शासनाची फसवणूक केली आहे.

शिरीर शहराबाहेरून जाणार्या शिरूर-पुणे बायपासच्या कडेला बाबूरावनगर हद्दीत देखील अनेक बेकायदेशीर होर्डिंग लागले असून, तेसुध्दा धोकादायक आहेत. रस्त्याने ये-जा करणार्या वाहनांना त्याचा धोका होऊ शकतो. बिनधास्त लागलेल्या या होर्डिंगवर जाहिराती लावल्या जात आहेत. मात्र, शिरूर ग्रामीण ग्रामपंचायतीकडे देखील याची नोंद नाही. सर्व ठिकाणी आलबेल सुरू असून, शासनाच्या नियमांची पायमल्ली होत आहे.

# पोलिस आयुक्तालयासमोरून तीन दुचाकींची चोरी

पुणे : एकीकडे नागरिकांची वाहने सुरक्षित नसताना, आता चोरट्यांनी थेट पोलिसांची वाहने चोरी करण्याचा पराक्रम केला आहे. बरं ही वाहने चोरट्यांनी थेट पोलिस आयुक्तालयासमोरूनच चोरी केली आहेत. त्यामुळे वाहन चोरट्यांना ‘खाकी’चा धाक आहे की नाही, असाच सवाल निर्माण झाला आहे. मतदान प्रक्रियेच्या कालावधीत पोलिस आयुक्तालयासमोरील पार्किंगमधून तीन दुचाकी चोरट्यांनी लंपास केल्या आहेत. याप्रकरणी अद्याप गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याची माहिती आहे. १२ ते १४ मे या कालावधीत ही वाहने चोरी गेल्याचे समजते.

खरं तर दुचाकींचे शहर म्हणून पुण्याची ओळख. मात्र, हेच शहर आता वाहनचोरट्यांचे शहर म्हणून नवीन ओळख करू पाहत आहे. मागील सव्वातीन वर्षांत शहरातून २४ कोटी ६८ लाखांची पाच हजार ८२२ वाहने चोरीला गेली आहेत. त्यात दुचाकी, रिक्षा आणि मोटारींचा समावेश आहे. शहरभर सीसीटीव्हीचे जाळे असूनही, पोलिसांच्या दुर्लक्षामुळे चोरटेही सापडत नाहीत आणि चोरीची वाहनेही मिळत नाहीत. ‘सद्रक्षणाय खलनिग्रहनाय’ असे ब्रीद मिरविणार्या पुणे पोलिसांच्या नाकावर टिच्चून चोरट्यांनी ही वाहने चोरी करण्याचे धाडस करून दाखवले आहे. त्यामुळे खर्या अर्थाने वाहन चोर्या रोखण्याचे पोलिसांसमोर एक मोठे आव्हान कायम आहे. शहरात वाहनांची संख्या मोठी आहे. त्यातही दुचाकीची संख्या सर्वाधिक, त्यामुळे पुण्यात वाहन चोरीमध्ये दुचाकी चोरीचे प्रमाण सर्वाधिक आहे. गेल्या काही वर्षांपासून वाहनचोरी ही पुणे पोलिसांसमोरील खर्या अर्थाने डोकेदुखी ठरत आहे. मात्र, आता पोलिस आयुक्तालयासमोर पार्क केलेली वाहनेदेखील सुरक्षित नसल्याचे दिसून आले आहे.

# आदिवासी कला, संस्कृतीला वगळून विश्वात्मक कल्याणाचा विचार अशक्य : डॉ. श्रीपाल सबनीस

## बहुरंग आयोजित १७ व्या आंतरराष्ट्रीय आदिवासी चित्रपट महोत्सवाचा समारोप

**पुणे | प्रतिनिधी**

आदिवासींची कला, संस्कृती वगळून विश्वात्मक कल्याणाचा विचार करणे अशक्य आहे. जंगलातल्या आदिवासी संस्कृतीला बाहेरच्या जगाशी जोडून घेणे, आदिवासींना आपलेसे करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. आदिवासी कला, संस्कृतीकडे दुर्लक्ष करणे ही आदिवासी नेत्यांनी समाजाशी केलेली बेईमानी आहे, असा आरोपही त्यांनी केला.

आदिवासी जमातीची सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, वेगळेपणा, त्यांची बोली भाषा, चालीरिती, जीवनशैली, धार्मिक कार्ये, देवदेवता, रुढी-परंपरा, कला, संगीत, नृत्य यातील वेगळेपणा सामान्य प्रेक्षकांना समजावा या उद्देशाने बहुरंगतर्फे पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन येथे आदिवासी चित्रपट महोत्सव आयोजित करण्यात आला होता.



समारोप सोहळ्यात डॉ. सबनीस अध्यक्षपदावरून बोलत होते.

दोन दिवसीय महोत्सवाचे उद्घाटन मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांच्या हस्ते आणि प्रसिद्ध नाटककार श्रीनिवास भणगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. तर समारोप अखिल भारतीय मराठी चित्रपट निर्माता महामंडळाचे अध्यक्ष देवेंद्र मोरे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या उपस्थितीत झाला. बहुरंग, पुणेचे अध्यक्ष आणि चित्रपट महोत्सवाचे संयोजक डॉ. कुंडलिक केदारी, सामाजिक कार्यकर्ते राज अग्रवाल उपस्थित होते.

आदिवासी संस्कृतीचे प्रतीक असलेल्या महिषासुराचे पूजन आणि दीप प्रज्वल करून महोत्सवाचे उद्घाटन आणि समारोप सत्राची सुरुवात झाली. आदिवासी संस्कृतीतील शेला आणि पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत डॉ. केदारी यांनी केले.प्रास्ताविकात चित्रपट महोत्सवाच्या आयोजनामागील भूमिका व्यक्त करताना डॉ. कुंडलिक केदारी म्हणाले, आदिवासींची कला, संस्कृती सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी शासकीय अनुदानाविना गेल्या १७ वर्षांपासून महोत्सव आयोजित करीत आहे. आदिवासींच्या कला, संस्कृतीबाबत निश्चित धोरण असावे, यासाठी पाठपुराव करीत असून राज्यातील चित्रपट महोत्सवात आदिवासी संस्कृतीविषयी चित्रपट आला तर त्याचा शासनस्तरावर गौरव व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.उद्घाटन सत्रात बोलताना श्रीनिवास भणगे म्हणाले, चित्रपटाला जशी गोष्ट असते त्याचप्रमाणे चित्रपटाच्या गोष्टीपलिकडेही एक गोष्ट असते. चित्रपटाचा आत्मा जाणून घेतल्यास चित्रपट आवडू लागतील, चित्रपटांविषयी आपुलकी निर्माण होईल.आदिवासी चित्रपट महोत्सवाला अनुदान मिळण्यासाठी पाठपुरावा करू तसेच भविष्यात महोत्सव भरविण्यासाठी महामंडळाच्या माध्यमातून सहकार्य करू अशी ग्वाही मेघराज राजेभोलसे यांनी दिली.आदिवासींची संस्कृती, इतिहास जपण्याचे काम डॉ. केदारी यांनी आदिवासी चित्रपट महोत्सवाच्या माध्यमातून केले असल्याचे मत देवेंद्र मोरे यांनी समारोप समारंभात व्यक्त केले. महोत्सवासाठी शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन त्यांनी दिले. राज अग्रवाल यांनी आदिवासी चित्रपट महोत्सवाच्या आयोजनाबद्दल केदारी यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भालचंद्र सुपेकर यांनी केले तर आभार धीरज केदारी यांनी मानले.

# पीएमपी-चारचाकी चालकाचा रस्त्यातच ‘राडा’

**फर्ग्युसन रस्त्यावरील घटना**

**पुणे | प्रतिनिधी**

पीएमपी बसचालक आणि एका चारचाकीचालकाचा वाद झाल्याची घटना नुकतीच फर्ग्युसन रस्त्यावर घडली. त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. अशा घटना सातत्याने घडत असून, त्या थांबविण्यासाठी पीएमपी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे. पीएमपी आणि इतर वाहनचालकांचे रस्त्यावर वाद झाले नाहीत, असा दिवस उजाडलेला नाही. दररोज शहराच्या कोणत्या ना कोणत्या रस्त्यावर, चौकामध्ये पीएमपी बसचालक आणि इतर वाहनचालकांचे वाद हे होताना दिसतातच.

हे वाद अनेकदा हाणामारीपर्यंत जातात, दोन्ही वाहनचालकांची डोकी फुटतात, रक्त वाहते. पोलिसांत गुन्हे दाखल होतात. यात चुकी कोणाची, यावरून शहरातील पोलिस ठाणी आणि चौक्यांमध्येच बसमधील प्रवाशांना घेऊन अनेकदा न्यायालयच भरते. कधी चुकी बसचालकाची असते, तर कधी वाहनचालकाची. मात्र, अशा घटना पीएमपी बसचालकांकडूनच सातत्याने होत असल्याचे समोर आले आहे. त्यातही हे बसचालक सर्वाधिक पीएमपीच्या ठेकेदारांकडील असल्याचे अनेकदा दिसते